म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा. ना.
दा. क्र. ४०६६

# मासले वाईळ
# गाणी

IRBK-0104066
IRBK-0104066

म. ग्रं. सं. ठाणे
बालवाङ्मय
नं. ४३३।

अमर ज्योति वाङ्मय

# दुसरे सात

नवव्या-दहाव्या यत्तांसाठी पुरवणी-वाचन



रघुवीर सामंत

[ तज्ज्ञांच्या मार्गदर्शनासह ]

दुसरे

वा. नं.: १३२.८०

११/११५२

वा. नं. ४३३

हो. क्र. ४०६६

अ. क्र. ४०६६

वा.

IRBK-0104066

IRBK-0104066

# मासलेवाईक आळी
## ( स्वभाव चित्रें )

# दुसरे सात

लेखक

**रघुवीर सामंत**

[ नवव्या-दहाव्या यत्तांना पुरवणी वाचनालायक ]

★

— विद्यार्थी-मार्ग दर्शन —

**श्री. भिवाजी अर्जुन परब**, एम्. ए., एस्. टी. सी.
राठींचे अध्यापक, चिकित्सक स. शि. हायस्कूल, मुं. ४. ]

**श्री. रघुवीर सामंत**, बी. ए. बी. टी.
ं मराठी अध्यापक, चिकित्सक स. शि. हायस्कूल, मुं. ४. ]

ऽे १८७३ ] पुष्प १२ वें [ मूल्य १५ आणे

—अमर ज्योति वाङ्मय प्रकाशन—

– मनोरंजन

ग्णी –

सौ. स्नेहल सामंत, बी. ए.
यांनीं
अमर ज्योति वाङ्मय प्रकाशनसाठीं
१४बी, हरजीवनदास एस्टेट,
व्हिन्सेन्ट रोड, दादर, मुंबई १४,
येथें प्रसिद्ध केलें.

या व पुढील सर्व आवृत्त्यांचे सर्व प्रकारचे हक्क
संचालक 'अमर ज्योति वाङ्मय प्रकाशन' यांजकडे

**मासलेवाईक प्राणी–दुसरे सात**

| | |
|---|---|
| १ एम्. एस्. एम्. | ४ मन चंगा |
| २ तरणा म्हातारा | ५ तो ऽ ओशाळा |
| ३ रेडिओ | ६ उस्तादजी |
| ७ दैन्य. | |

श्री. रघुनाथ ज. सामंत, बी.ए.बी.टी.
यांनी
सागर साहित्य छापखाना,
२०, त्रिभुवन रोड, मुंबई ४,
येथें मुद्रित केलें.

# मासलेवाईक प्राणी

## ( दुसरे सात )

## [ दुसरी ओळख ]

मासलेवाईक प्राण्यांतले हे दुसरे सात—हेहि तितकेच विविध नि अष्टपैलू मासले आहेत.

बुद्धीच्या व शरीराच्या हालचालीत ‘ एम्. एस्. एम्. ’ सारखा कमालीचा संथपणा अंगांत असलेला व त्याच्या विशिष्ट परिस्थितीमुळें मनाचा अगदीं चोरबाजार झालेला असला तरी एकूण प्रामाणिक वृत्तीचा मन्या तुमच्या अंगावर जातां जातां ‘ गोल फेक् ’ करील नी हसवील.

म्हातारपणांतहि तरुणाच्या उत्साही मनानें जगाकडे खेळकर मिस्कीलपणें पहात निरुपद्रवी गंमत उडवून ( जगाकडे सुतकी चेहऱ्यानें पहात जे जीवनांतील भकास गांभीर्य संभाळतात त्यांना ) भय्याकाका हसवून गाजवतील नि अंतीं योग्य तोच धडा देतील.

शिक्षणाचा पोपटपंची उपयोग करून केवळ सुखासीन आयुष्य जगणाऱ्यांच्या मनाचे बंद पडलेले ‘ रेडिओ ’ गजाभाऊ आपल्या जोरदार विचारांच्या आकाशवाणीने व प्रत्यक्ष जीवन-प्रसंगांनी क्षणभर तरी हुदरवतील नि खाडकन् चालू करतील.

नकळत जुळून आलेल्या वधूपरीक्षाप्रसंगींच्या प्रेमळ पण फटकळ वाश्याच्या हालचालींमधून तुम्हाला ‘ यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं-नाचरणीयम् नहि करणीयम् ’ अशासारखा विचारी संदेश मिळेल.

एखाद्या क्षुल्लक घटनेतून माणसाचं आयुष्य किती आमूलाग्र पालटतें पण त्याच्या मनाला त्याच्या जुन्या परिस्थितीच्या खोल दडलेल्या

जाणिवांचा किती भयंकर सासुरवास होत असतो तें तुम्हाला उमदा गणपत आपल्या अनुभवावरून सांगेल.

लबाडी, नागडा स्वार्थ, गोंधळ यांनी बजबजलेल्या भोंवतालच्या जगांतहि, वस्तादर्जीसारखे (अशिक्षित पण सुसस्कृत असे) माणुसकीचें विराट स्वरूप प्रत्यक्ष स्वरूपांत दाखवणारे-धीर आत्मे कसे अज्ञातपणें वावरत असतात व त्यांच्या मर्यादित कक्षेतल्या छोट्या हालचालींतील मोठे आशय प्रतीत झाल्यामुळेंहि जीवनाबद्दलची दिव्यता व कृतज्ञता मनांत कशी भरुन येतें, याची एक चुणुक तुम्हांला ' उस्ताद ' नक्की देतील.

आणि अखेर विनायक मास्तरांच्या ' दैन्यांत ' देखील तुम्हाला मानवी जीवनातील कांहीं उच्च तत्वांचा प्रत्यय आल्यावाचून राहणार नाहीं.

हें झालं या निरनिराळ्या ' प्राण्यां ' च्या विशिष्ट व्यक्तित्व-जीवनाच्या मंत्रांबावत !-तत्व-विषय-विचार-भावना याबाबत.

पण या व्यक्ती केवळ कांहीं शद्बांच्याच रूपानें-प्रत्यक्षच जणूं तुमच्या समोर उभ्या कशा राहिल्या ?...त्या त्यांच्या शद्बमय व्यक्तिचित्रणाचें तंत्र तरी कोणतें ? सहज रस्त्यानें जातांना अनेक व्यक्तींचा आपल्याला अगर आपला त्यांना धक्का लागतो. त्यांच्याकडे आपण पाहतों पण तरी त्या साऱ्याच ( अगर त्यांच्यांतील असल्या कांहीं विशेष व्यक्ती असतात त्या देखील ) आपल्यासमोर इतक्या सर्वांगीण हुबेहूबपणें उभ्या रहात नाहींत; त्यांच्या व्यक्तित्वाची आपल्यास. जाणीव होत नाहीं. त्यांच्याबद्दल इतकी आपुलकी नि आत्मीयता आपल्या मनांत निर्माण होत नाहीं. असें का ?...नि या सर्व गोष्टी पांच सात पानांमधील कांहीं शद्ब मात्र बऱ्याच अंशानें चटकन् करुं शकतात. हें कां ?—यांत कोणतें तंत्र असतें ?

तेंच आपण आतां जातां जातां पाहिलें पाहिजे—

वा-वा ७३

मूर्त स्वरूपांत असलेल्या सृष्टीचा अनुभव आपण आपल्या इंद्रियांच्या साह्यानें घेतों. त्याच प्रकारचा किंबहुना त्याहूनहि जोरदार अनुभव मनाला देऊं शकणारी व त्या सृष्टीची मनांत हुबेहूब प्रतिकृति निर्माण करूं शकणारी कुशल कलापूर्ण शद्बयोजना–म्हणजेच 'शद्बचित्र.' पण कल्पना, भावना, मानवी स्वभाव, मानवी गुणदोष, व्यक्तीचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, मनांत चटकन् भरतील अशा त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण लकबी, परिस्थितींतील विशिष्ट घटना नि प्रसग,...या सर्व केवळ मनानें आकलन करण्यासारख्या गोष्टी जेव्हां असल्या कलापूर्ण शद्बचित्रणानें आपल्यासमोर मूर्त स्वरूपांत येतात, तेव्हां असल्या कलाकृतीला आपल्याला 'व्यक्तिचित्र' म्हणतां येतें.

एखाद्या व्यक्तीचें शद्बांत चित्र उभें करावयाचें म्हणजे त्या व्यक्तीचें बाह्यांग व अंतरंग दोन्ही छोट्या छोट्या शाद्बिक फटकाऱ्यांत उभीं झालीं पाहिजे. 'भांडखोर', 'खेळकर', 'त्यागी', 'दुबळ्या मनाचा', 'स्पष्टवक्ता', माणुसकीनें मुसमुसलेला, न्यूनगंडाने पछाडलेला, असल्या केवळ एकदोन योग्य शद्बांच्या लेबलांचा उपयोग करून कोणत्याहि व्यक्तीच्या अंतरंगाचें खरें दर्शन होणार नाहीं. आणि तेवढ्यानें व्यक्तिचित्र–कलाकृती तर कधींच होणार नाहीं. उलट, ' मध्यम अंगकाठी ', ' शेपटेवाल्या कॉलेजकन्यका ' ' वळवाचा पाऊस '; ' कानठळ्या बसवणारा आवाज ', ' वरळी चाळीतला संसार ' ' चुलीजवळून तणतणणें ', ' उंदीर-मांजराचा खेळ ' असल्या शद्बसमूहांतून आपल्या पूर्व अनुभवाला धरून, विविध इंद्रियांना भासमान होणारी समूर्त चित्रें वाचकांसमोर चटकन् उभीं राहतात. या दृष्टीनें बाह्यांग निर्मिणारी शद्बचित्रें अंतरंग निर्मिणाऱ्या शद्बचित्रांतील शद्बयोजना–निवडीच्या मानानें अधिक सुलभ असतात. ओघानेंच, व्यक्तिचित्रांत अंतरंगचित्रणाला व त्यासाठीं करवयाच्या मालमसाल्याच्या निवडीला नि मांडणीला फारच महत्व असतें. म्हणूनच एकेका विशिष्ट गुणदोषाच्या आविष्कारासाठीं त्या व्यक्तीच्या आयुष्यांतील कांहीं निवडक घटना, त्याच्या त्या त्या वेळच्या हालचाली, आविर्भाव, उद्गार, नि वागणूक यांच्या आकलनाची, निवडीची नि मांडणीची व्यक्तिचित्रणकलेत फार महती असते.

जिवंत माणूस जगांत विशिष्ट प्रसंगीं वागतो कसा यावरून त्याचें व्यक्तित्व समजतें. प्रसंग हे विशिष्ट वातावरणात घडतात. त्यावेळची भोंवतालची सजीव व निर्जीव सृष्टि व तिकडे पाहण्याचा त्या व्यक्तीचा विशिष्ट दृष्टिकोण यावरच त्याच्या त्या विशिष्ट व्यक्तीत्वाचें प्रतिबिंब--चित्रण अवलंबून असतें 'हा गबाळ्या' 'तो मूर्ख', 'हा चाणाक्ष' 'तो खेळकर', 'तो प्रेमळ' 'हा दुर्दैवी' असे न्यायाधीशाचे निकाल सांगणें म्हणजे व्यक्तिचित्रण नव्हे. खरें म्हणजे तें काम अखेर वाचकाचें असतें. आणि त्या त्याच्या निर्ग-यांना ती ती व्यक्ती, त्या त्या पार्श्वभूमीसह व त्या वातावरणांतील इतर दुय्यम व्यक्तींबरोबर प्रत्यक्ष जगत असल्याचें शब्दरुपानें हुबेहूब दाखवणें हेंच व्यक्तिचित्रकलाकाराचें काम असतें. म्हणून त्या हेतूनें आपल्या निरीक्षणाचा मालमसाला कसोशीनें गोळा करून, त्याची सूचक व मासलेवाईक निवड करून, तिची सुरवातीपासून अखेरपर्यंत सूचकता व उत्सुकता कायम ठेवणारी मांडणी करणें ज्याला जमतें, तोच उत्तम व्यक्तिचित्रकला निर्माण करील. असल्या व्यक्तित्व–प्रतिबिंब चित्रणानें होणाऱ्या सुंदर व्यक्तिचित्राची वाचकाबरोबरची अगदी पहिली ओळख शीर्षकातून होते व म्हणूनच तेंहि आकर्षक, सूचक, औत्सुक्यवर्धक व अर्थपूर्ण करून व्यक्तिचित्रकार आपल्या कलेची संपूर्ण परिणति करतो व असल्या समर्पक शीर्षकरूपानें तो त्या कलाकृतीचा जणूं पूर्ण विराम लिहितो.

तेव्हां या दुसऱ्या सात प्राण्यांचा अभ्यासावेळीं वरील सर्व गोष्टी लक्षांत घेऊनच, त्यांतील कलात्मक बारकाव्यांचें तुम्ही आकलन करा व व्यक्तित्वचित्रणाची ही कला प्रस्तुत व्यक्तिचित्रकाराला कुठपर्यंत व कोणकोणत्या बाबतींत साधली आहे तें स्वतःचें स्वतः ठरवा.

९३२८० ११।१।६२

## ' एम्. एस्. एम्. ' ★ ८

नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें, त्याच्या भेटीसाठीं, मी त्याच्या घरीं पोचलों...

दिवस, वेळ, सारं ठरलेलं; त्याचं घर मला माहीत.—पण संपादक म्हटला, कीं, ठरल्यावेळीं तो घरीं हटकून सांपडायचा नाहीं; त्या निरुद्योग्यांच्या कार्य-बाहुल्याची झाली तर त्यामुळेंच काय ती जगभर जाहिरात व्हायची !—

तो अर्थात् घरीं नव्हता; पण दारांत त्याचा हाफपँटेतला ' ओला गडी ' मात्र बसला होता. काळा सांवळा वर्ण, मध्यम अंगकाठी, गंभीर चेहरा, तेल चोपडून पाडलेल्या वांकड्या भांगाच्या वर उभ्या राहिलेल्या लांब बटा, मागें मानेवर लडबडणारी वीत दोन वीत लांबीची शेंडी,...पडल्या चेहऱ्यावर भरपूर खिन्नतेची परीटघडी नि डोळ्यांत गढूळलेल्या सागराचं गांभीर्य...

त्या साऱ्या दृश्यानें थोडं बिचकतच मी त्याला विचारलं—" आहेऽत का रे तुझे संपादकसाहेब ? "

" घरांऽत नाय् मिलत ! " ब्लॉकचं कुलूप काढीत, अगदीं गद्य, निर्विकार चेहरा करून तो म्हणाला. ( जणुं काय, कुलूप लावलेल्या त्या खोलींत त्याचे साहेब बसले होते, असंच मी समजत होतों, त्याच्या मतें !— )

" गेले आहेत कुठं ? " तरी मी गेंड्यांची कातडी करून, रसरशीत उत्सुकता दाखविलीच—" नि परत... "

" कोऽऽन् जान् ! पूर्वीपेक्षांहि निर्विकार चेहऱ्यामनानें तो म्हणाला.

दुसऱ्या कोणालाहि, तात्काळ ' अबाऊट टर्न ' च करावंसं वाटलं असतं, त्याच्या त्या वाक्यांतील तीं अंदोलनं ऐकून ! पण मी चिकाटी सोडली नाहीं. आपण होऊन दार लोटलं नि कसलीहि वाट न पहातां, माझ्या संपादकमित्राची तेवढीच वाट पहाण्यासाठीं, पहिल्या खोलींतल्या आरामखुर्चीवर ऐसपैस ठिय्या दिला मी—

— २ —

दोन दिवसांपूर्वीच्या पुण्याच्या भेटींत, ' संपादक वहिनी ' माहेरीं गेल्याचं समजलंच होतं ! तेव्हां स्वारी लौकर घरीं परतेल कीं काय, याबद्दल शंकाच होती.

पडल्या पडल्या, प्रथम मी खिशांतील उरलेली एकुलती एक सिगारेट ओढून टाकली; नंतर, खुर्चीमधील चारपांच ढेकणांना शोधून यमसदनाला पाठविले; मग... फार जुन्या परिचयाच्या त्या ईझिचेअरचे लांकडी हात सहज एकदां हातांत निखळून काढले; पुन्हां घाबरल्यासारखे करीत, ते जिथच्या तिथं नीट ठोकून बसवले; त्यावर तबल्याचे बोल काढून पाहिले. नंतर एकदां नुसतं उताणं पडून वरचे बहालहि मोजले.

तरी पण, दोस्त-संपादकांचं परत येण्याचं चिन्ह कांहीं दिसेना !

मग मी थोड्या रागानेंच पुटपुटत, खोलींत चौफेर दृष्टि फिरवली; पण समोरच्या भिंतीवर मध्यभागीं टांगलेल्या एका तसबिरीकडे वळून, तिथं ती एकदम खिळतांच... मला धक्काच बसला. आश्चर्यानें जागचा उठलों; जवळ गेलों;... विश्वासच बसेना डोळ्यांवर !—कारण, रामपंचायतन होतं तें. रामासीतेच्या डोक्यावरील भली मोठी रंगीबेरंगी छत्री व पायाजवळ हात जोडून बसलेले बलभीम मारुतीराय ! मी त्यांच्याकडे पाहून हंसलों; तेहि माझ्याकडे पाहून हंसले; ( निदान तसा भास झाला मला ).

मी हंसलों ! कारण, निरीश्वरवादी संपादकमहाशयांच्या खोलींत तें होतं !—चित्रांतील तीं मंडळी माझ्याकडे बघून कां हंसलीं, तें मात्र मला संपादक आल्यावरच नीट कळलं !—

— २ —

आणखी एक देखील तसबीर तिथं नव्हती. अधिक बारकाईनें पाहिलं;... तेव्हां, ठिकठिकाणीं भिंतीवर चित्रं मात्र पसरलेलीं दिसूं लागलीं.

एका कोपऱ्यांत एका माणसाचं चित्र होतं. त्याचं 'U' सारखं नाक, नागाच्या फड्यावरील दहाच्या आंकड्याप्रमाणें दिसणाऱ्या मोठ्या कल्ल्याच्या मिशा, व दातांची विचकलेली हंसरी शुभ्र 'मॅक्लीन' कंवळी; दाराजवळच भिंतीवर एक बाई उभी होती. V8 मधील आठाच्या बारक्या गांठीप्रमाणें डोक्याच्या मोठ्या वर्तुळाला चिकटलेली आंबाड्याची छोटी गांठ, कपाळावरील जगदंबा छाप कुंकूं,...एवढ्यावरूनच ती मला बाई वाटली ! नाहींतर झोंपवली कीं उठून बसणाऱ्या शिशाच्या बाहुलीसारखी ती पायाऐवजीं ढुंगणावरच बसली

होती ! एक दोन ठिकाणीं सापाचे फडे दिसत होते. पण अधिक संशोधनानंतर त्याला जोडलेल्या मानाकानांवरून तीं शेपटेवाल्या कॉलेजकन्यकांचीं चित्रं असल्याचा बोध होत होता.

पुरुष आणि स्त्री यांचीं चित्रं,... असल्या एकाच पण कल्पक सांच्यावर एकहातीं काढल्यामुळें, ठिकठिकाणीं त्याच्या पलटणीच तयार झाल्या होत्या. तेव्हां ओघानेंच, त्यानंतर त्यांच्या मुलांचीं चित्रं पहाणं देखील मला भाग पडलं. त्यांतलीं कांहीं तर झुरळासारखीं दिसत होतीं. कांहीं हत्तीसारखीं व कांहीं पंख असलेली, 'मदना' सारखीं किंवा उडत्या पाखरांसारखीं!–माणसांनंतर पाळीव प्राणी, पाळीव प्राण्यांवरून हिंस्त्र पशू आणि त्यापुढें पक्षांना सारं आकाश मोकळं मिळालं होतं. अशा तऱ्हेनें जगांतील यच्चयावत शिकारखाना त्या खोलींत भिंतीवर ठिकठीकाणीं बांधून ठेवला होता. कलावंत मजकुरांचे हात व कल्पक डोकं मोठ्या तरलतेनें व सफाईनें जग पादाक्रांत करत चौफेर फिरलं होतं!—

त्या चित्रकलेचं आंबट कौतुक करीत, मी संपादकाच्या टेबलाकडे वळलों.

स्वारीचा अजूनहि पत्ता नव्हता. तेव्हां टेबलावर पडलेल्या मासिकांच्या व पुस्तकांच्या लगडी मी सहज म्हणून चाळूं लागलों. परंतु प्रत्येक पुस्तकाच्य शिरोभागीं 'M. S. M.' 'M. S. M.' अशीं तांबड्या–निळ्या–काळ्याआदि सर्व रंगांच्या पेन्सीलींनीं किंवा शाईनीं अक्षरं घोटलेलीं दिसत होतीं! पुढलीं दहापंधरा मिनिटं पुस्तकांतलं कांहीं वाचण्याऐवजीं, पुस्तकांवरील हें 'एम्. एस्. एम्.' रेल्वेचं 'क्रॉसवर्ड पझल' सोडवीत, मी टेबलावरील सारी लगड वरखालीं केलीं,...चाळलीं.

पण 'एम्. एस्. एम्.' चं अस्तित्व नसलेलं एक पुस्तक म्हणून मला औषधाला सांपडेना!!

•

— ४ —

इतका वेळ मी असा अंतर्मुख होऊन खोलींतल्या खोलींत भ्रमण करीत होतों. पण संपादकांचा गडी मात्र त्याच ठरीव–घडीव गंभीर चेहऱ्यानें, आपल्या साहेबांची वाट पहात दारांत निश्चल बसला होता!

शेवटीं कंटाळून (त्या अर्ध्या तासाच्या संशोधनानें दमून भागून) मी मात्र पुन्हां एकदां खुर्चीवर आडवा झालों.

तोंच संपादकमहाशय खोलींत घाई घाईनें प्रवेश करते झाले. त्यांचा चेहरा अगदीं पडला होता. आंत शिरतांच ते निर्जिवपणें हंसून म्हणाले, "एस्क्यूऽज हं! मला फार उशीर झाला; ॲपॉईंटमेंट चुकली रेऽबुवा..."

पण कपडे काढून समोरच्या खुर्चीवर तो बसण्यापूर्वीच मी हंसून म्हणालों, "छे छे! माझी तर बसल्या बसल्या खूपच करमणूक झाली इथं, वेड्या!"

दारांतून उठून चहा करायला आंत शिरणाऱ्या आपल्या गड्याकडे माझ्या मित्रानें किंचित् संशयी मुद्रेनें टवकारून पाहिलं व मग माझ्याकडे आपला प्रश्नार्थक चेहरा वळवून तो म्हणाला–"करमणूक?? म्हणजेऽ?"

टिंगल करायला तो मोका बरा वाटल्यावरून मी एकदम त्याच्यावर भडिमार केला–"होंऽ! भिंतींवरलि आपल्या चित्रांनीं!! केव्हांपासून संपादन केलीत ही कला, महाशय?"

मला वाटलं होतं, तो आतां थोडा लाजेल,... रागावेल!– पण त्याचा चेहरा उलट गोंधळला –

"...आणि हें रामपंचायन अगदीं दिवाणखान्यातसं? अलीकडे देव आला आहे तर एकूण आपल्या जगांत?..." मी त्याच्या विचारसरणीवरच चाल केली.

तरी तो प्राणी गप्प!– फक्त एकदां माझ्याकडे रागारागानें पाहून, त्यानें मला डोळ्यानें, 'गप्प रहा' असं सुचविलं.

"आणिऽ काहोऽसंपादक?– 'एम्. एस्. एम्.' रेल्वेबद्दल एवढं प्रेम कां वाढूं लागलंय् तुमचं हल्लीं?–का मासिकाला मोठी जाहिरात मिळालीय् तिची??" माझ्या तिसऱ्या प्रकारच्या सूक्ष्म शोधावरच या नव्या माऱ्याचा मोर्चा मी उभा केला होता.–

"माझेऽ आईऽ!– आतां क्षणभर गप्प बसाल का जरा!– मग सांगतों–" मला मधेंच थांबवून, तो शेवटीं त्राग्यानें म्हणाला.

– ५ –

कारण... तेवढ्यांतच, चहाच्या दोन कपांसह तो गडी बाहेर आला होता. दोन्हीं कप दोघांच्या हातांत देतांना, त्यांच्या कायम गंभीर चेहऱ्यावर, क्षणभर

हास्य चमकून नाहींसं झालं! काळ्या ढगांत चमकून जाणाऱ्या विजेची आठवण झाली मला, तें पाहून –

पण त्याच वेळीं संपादकाचा चेहरा मात्र अचानक चपापलेला दिसला.

आणि गडी आंत जातो न जातो, तोंच,...अगदीं चमकून आपल्या हातांतलि व अधीरपणें माझ्याहि हातांतील कपाचा एकदम कान पकडून, तो गडबडीनें म्हणाला, " बघूं, बघूं ऽ ? घरांत आज नवीनच कप आलेले दिसताहेत !– सकाळपासून दोन कप इहलोक सोडून गेले ! – आणि आतां हे दोन नवीन पाहुणें आले आमच्या जगांत !–"

त्यानें पुन्हा बशींत ठेवलेल्या माझ्या हातांतील तांबड्या-हिरव्या भडक मारवाडी वेलबुट्टयांच्या कपाकडे पहात मी म्हणालों,–"वा :, काय पण संपादकीय सौन्दर्यदृष्टि ! !"

"चूप! माझी नव्हे ! – त्याची ! !" तो पटकन् आंत बोट दाखवून म्हणाला– " कित्येक गोष्टींचा तो त्याचा तोच असा हातोहात स्वतंत्र निर्णय घेतो ! –"

थोडा वेळ आम्हीं दोघेही निमूटपणें चहा घेत होतों.

शेवटीं, त्यानेंच पुन्हां सुस्कारा टाकून म्हटलं "पण करणार काय सांगा ?-- प्रामाणिक आहे, कामसू आहे ! -- काम करायला तर बेटा एका पायावरच तयार नेहमीं ! -- म्हणून तर हातून अशा वस्तू पडतात न् फुटतात !– कांहीं सांगण्या ठरण्यापूर्वीच तो तें करायला धांवूं लागतो !– शेवटीं, वेळेवर त्याचीच मात्र शोधा-शोध करावी लागते आम्हांला !– पण सांगितलेलं कांहीं सुरळीत होत नाहीं, हा कांहीं त्याचा दोष नसतो. कारण... न सांगितलेल्या गोष्टीच तो जास्त करतो–"

कप खालीं ठेवून, खिसे चाचपून, सिगारेट नसल्याचं मी माझ्या दोस्ताला हळूच सुचविलं !—

त्यानेंहि झटकन् उठून, चारपांच सिगारेटी असलेलं आपल्या कोटांतील पाकीट काढून माझ्यापुढें ठेवलं.

— ६ —

"आणि दुसरं असं,--कामापेक्षां प्रश्नचिन्हंच फार उभीं रहातात त्याच्या-पुढें !" संपादक किंचित् हसून मला हळूच पुढं म्हणाला; "आतांच एक चुणक

दाखवतों तुला, हं ! बऽघ... ''

तेवढ्यांतच, रिकामे कप न्यायला त्याचा तो गडी आला. परततांना तो आपल्याशींच हंसतमुखानें कांहीं पुटपुटत होता. तोंच त्याचे साहेब त्याला म्हणाले " अरेऽ हें ऽ बघ,... नाक्यावरून एक गोल्डफ्लेक पाकीट घेऊन ये. "

कप हातांत तसेच ठेऊन तो गोंधळून म्हणाला, " आपण आणतों तें 'पिलेर' आणलू तर ?

" अंहऽक् नको !– या साहेबांना तें नाहीं आवडत ! गोल्डफ्लेकच आण !... सात आणे पडतील– "

" त्याच्याकडे तें नाय मिलल् तर ?– "

" दुसऱ्याऽ दुकानांत जाऽ रे !– "

" जास्त मागितलेन् तर पैसे ?– "

" अरेऽ बावा ऽ नाहीं मागणार तो !—तेवढेच पडतात !– "

क्षणभरानें कप आंत ठेऊन, अधेली हातांत घेत, वांवरल्या चेहऱ्यानें निबुजऱ्या बैलासारखं पहात तो म्हणाला–" आन् कमी पैसे पड्ल तर, साहेब ? "

" अरे बावा, मिळालं तर आण ! पण कमी नाहींच पडायचे ! सगळ्या दुकानांत सात आणेच पडतात !—" संपादक शेवटीं चिडखोरपणें बोलला.

तेव्हां,... " गोल् फेक् " असं आपल्याशींच मोठ्या मोठ्यानें पुटपुटत, आटवणीसाठीं हातानें वर्तुळाचा व पुढें फेंकण्याचा आविर्भाव करीत त्याचा तो अवलीया दाराबाहेर निघून गेला.

— ७ —

मला त्याच्या त्या हालचालींची गंमत वाटली. तो निघून गेल्यावर मित्राला विचारलं, काय रे, आणलयंस कोठून बाबा हें नवीन पार्सल तूं ?— "

" कोण हाऽ कां ?— गांवचाच आमच्या ! " मला संपादकीय स्पष्टीकरण मिळालं. " एका संपादकाचा गडी आहे ऽ म्हटलं !–सात यत्ता झाल्या आहेत सात, ! इंग्रजी पाट्या वाचतो ; ' टाईम्स ' कोणता , ' क्रॉनिकल ' कोणता , त्याला नक्की समजतं ! घरांतल्या झाडून साऱ्या साहेबांचीं न् बाईसाहेब–ताईसाहेबांचीं नांवं त्याला इंग्रजींत लिहितां येतात !...इथलीं सगळीं मराठी मासिकं न् पुस्तकं तर

माझ्यापेक्षां तोच अधिक वाचतो !...वाचलेलं सगळं ' पचवतो '— आचरणांत आणतो !...आणखी सांगू ?- लेखकहि आहे बेटा ! आतांपर्यंत अनेक अप्रसिद्ध लेख लिहिले असतील त्यानें ! पण त्यांतला एकच पहिला न् शेवटचा त्यानें माझ्याकडे प्रसिद्धीसाठीं पाठवला होता !-- ”

संपादक थोडा मिस्कीलपणें हंसला व टेबलावरलीं पुस्तकं वरखालीं करून, त्यांच्याखालीं लपवून ठेवलेलीं गोंदानें चिकटलेलीं चारपांच चिटोरीं काढून त्यानें तीं माझ्या हातीं दिलीं.

ती एक सचित्र गोष्ट होती. स्वत: लेखकानेंच आपलीं रेषाचित्रं काढलीं होतीं. लेखकाचं नांव “लेखक--???” एवढंच लिहिलं होतं; म्हणजे ठरलं नव्हतं. गोष्टींच नांव-- ' तो आणि ती '-- नायकाचं नांव ' सख्याहरी; ' नायिकेला तो ‘वल्लभे ’ ' प्राणप्रिये ' अशा हांका मारीत होता.

लेखांत मजकुरापेक्षां चित्रंच जास्त होतीं. त्या चित्रांत फुटका–आरसा, मोडकी फणी, असलीं वेषभूषेचीं साधनं सुचविणारीं न्यारीं रेखाचित्रं दिसत होतीं. त्रिलियंटाइनच्या बाटल्यांची कापून चिकटवलेलीं चित्रं, टाइम्समध्यें उलटी झालेली मोटार वगैरे त्या लेखाच्या बाह्य अलंकारांवरून, ती वाचण्यापूर्वीच त्यांतली गोष्ट नकळत ' चाणाक्ष वाचकां” ना समजून येत होती.

गोष्टीचा शेवट मात्र जरा चमत्कारिक होता. कारण, नायक ' सख्याहरी 'नें एकदां आपल्या वल्लभेला ' अंगूलीला पाणी काडाया ' सांगितलं; तिनें तें काढलं नाहीं. मग एकदां, तीं दोघं आपल्या खेडेगांवीं असतांना,... ' फिराया चल् ' म्हणून त्यानें तिला लाजत येऊन विनवलं. तेव्हां ' सासूबाय गागल ! ' असं सांगून तिनें त्याला स्पष्ट नकार दिला; तेव्हां शेवटीं, सख्याहरीनें तिला खूप मारली. मग ती पळाली. तिनें त्याच्यावर ' करणी ' केली व दुसऱ्याशीं पाट लावला !— हा आजारी पडून मरतां मरतां वांचला !—

मला माझं हसूं कांहीं केल्या आंवरेना !—

तेवढ्यांतच, संपादक म्हणाला— “ त्यांत लेखकाचाच सारा इतिहास आहे,... म्हणेनास !—”

हसूं दाबून त्याच्याकडे मी प्रश्नार्थक मुद्रेनें पाहिलं–

" छापायला बाहेर पडलेला हा त्याचा पहिला आणि शेवटचाच लेख!–" संपादक अभिप्राय देऊं लागले. " तीन महिन्यापूर्वी मी घरी आलों, तों टेबलावर हा लेख! कोणी आणून दिला, तें तो बोलेना!– आतां बाहेर गेला ना, तोच हो सख्याहरी!– त्याची बायको खरोखरच असल्या कारणासाठीं पळून गेली. त्यानंतरच तो माझ्याकडे रहायला आला! बिचारा ऐन तारुण्यांत चिरविधुरावस्था कंठीत आहे. फिर्याद करून यानें बायकोचा कब्जा मागितला; तर तिनें पटकन नुकसानभरपाई दिली !... पण परत याच्याबरोबर नांदायला कांहीं येईना. आलेल्या पैशांतले नऊदशांश त्या वकिलानें खाल्ले !– आणि आमच्या सख्याहरीला मात्र बायको ही चीज कायमची पारखी झाली !–"

–८–

" आत्मचरित्राचा या पुढला हप्ता लिहिलान् नाहीं त्यानें ? " मी उत्सुकतेनें पृच्छा केली.

" अं हंऽ क ! या लेखाचा लेखक दुसऱ्या दिवशीं मी ओळखतांच, ' सख्याहरी ' आठवडाभर घरांतच दिसेना ! संपादक जरा चेष्टेनें म्हणाला– " आम्ही दोघंही घरांत नसतांना, हळूच आपल्याकडची किल्ली लाऊन तो खोली उघडी. भांडीं घांसून पुसून साफ करी. झाडलोट करी. उरलं असेल तें खाई–रात्रीं उशीरां येऊन बाहेरच झोपे. सकाळीं लौकर उठून पळे !– "

" वा: ! म्हणजे मोठा रोमॅंटिकच आहे कीं,... तुमचा सख्याहरी !" मी हसूं लागलों.

" एक दिवस तुझी वहिनी सकाळींच उठून त्याला उपदेश करीत असल्याचं मला ऐकूं आलं– " असले नाहीं ते लेख लिहिण्यापेक्षां,... चांगलं मन लावून काम कर जाऽना !–म्हणजे नाहीं लाज वाटणार !..."

त्यानंतर मात्र त्यानें पुन्हां लेख लिहिण्याचा नि तो आमच्या मासिकाकडे पाठविण्याचा प्रयत्न केला नाहीं. खूप वाचूं लागला; इंग्रजी शिकूं लागला !... आतां मात्र त्यातून दुसराच एक अनर्थ ओढवलाय् !– तो इंग्रजी लिपी घोंटत आहे हल्लीं !—'

बोलतां बोलतां, मघाची तीं टेबलावरची सर्व मासिकें नि पुस्तकें उचलून

माझ्यापुढें टाकत, महाशय किंचित रागानेंच मला म्हणाले—"हेंऽबघ !... कार्यालयांत प्रथम एखादं पुस्तक आलं, कीं,... पहिल्या दिवशीं तें कोरं,... दुसऱ्या दिवशीं कार्यालयाचा एक छाप; मग त्यानंतर,... रोजीं तीनचार प्रमाणें,.... पुढल्या पंधरवड्यांत पाठीपुढं सर्व बाजूवर छापाचं हेंऽजाळं होतं! मग होतं हस्तकला-कौशल्य सुरू; लागते फिरायला,... एम. एस्. एम्. गाडी... पानापानांतून ! शेवटीं, कोणी महिन्याभरानें अंक पहायला मागितला, तर ..."

" अरे पण... ' एम्. एस्. एम्. ' गाडीचा इथं संबंध काय ?–मघांहि मला तेंच कोडं पडलं होतं !... "

" रेल्वे कंपनीचा नाहीं रेऽबुवा कांहीं संबंध !– " संपादक चिडून ओरडला, " ती सही आहे त्याची–' मऱ्या सूर्या मोरे ! ' –काम–समज–उमज या बाबतींत मात्र एम्. एस्. एम्. गाडीशीं मऱ्यांचं बरंच जवळचं नातं आहे !— "

— ९ —

" लेखन थांबवलेत ना त्याचंऽ ! त्याचाऽपरिणाम हा ! " त्याला आणखी चिडवण्यासाठीं मी म्हणालों.

" अरे, हें पत्करलं; पण... " तो तिरमिरीनें डोळे गरगरां फिरवून म्हणाला– " लेखन थांबल्यामुळें त्याची चित्रकला फार वाढलीय्;... आणि कला म्हणजे भावनाविष्कारच ना ?–तेव्हां आतां भिंतीभिंतींवरून तो दररोज लाखो चित्रं काढतो. आणि तो नसतांना, आम्हीं दोघं तीं पुसून काढतों. दुसऱ्या दिवशीं पुन्हां त्याहून अधिक दाटीदाटीनें तीं अवतीर्ण होतात—अगदीं त्याच ठिकाणीं !–बरं...त्यालाच काढून टाकावं म्हटलं, तर दुसरा चांगला घरोब्याचा न् असा प्रामाणिक मनुष्य मिळणार आहे कां ? तेव्हां करणार काय ? दुभती म्हैस घरांत पाहिजे,... तर तिची शिंगंही संभाळलीं पाहिजेत !– "

बोलतां बोलतां तो उठला नि टेबलाखालच्या जुन्या मासिकांचा जुडगा सोडून माझ्यापुढें पसरत, रागारागानें पाय आपटत तो ओरडला–" तो पहा !– तुझ्या डोळ्यांनींच पहा प्रत्यक्ष !– कोणता शहाणा मनुष्य जिवंत राहूं शकेल अशा स्थितींत, अशा घरांत !– "

भांबावून, मीहि प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलं;–त्या मुखपृष्ठावरील ती चित्र-

कला,... आतांपर्यंत पाहिलेल्या नमुन्यांहून अभिनव व मनोरम होती. स्त्रियांचे मुखवटे वर घालून मासिक अलंकृत करणाऱ्या संपादकांना, एक नवी दृष्टी व नवा इषारा देण्यासाठीं, त्या प्रतिभावान् चित्रकारानें तिथल्या रमणीजनांना कल्लेदार मिशा लादल्या होत्या; उलट, त्यांचे हात हातीं धरणाऱ्या कर्तृत्ववान् पुरुषांच्याच हातांत बांगड्या व [ बस्टमधील मोठ्या नाकाला शोभतील अशा ] मोठ्या नथी अगर चमक्या त्यांच्या नाकांत त्यानें चढवल्या होत्या !

" दिवसेंदिवस मला तर अगदीं विरक्तता येऊं लागलीय् बघ,...असले सारे हे घरांतले भुताटकीचे प्रकार पाहून ! " संपादक चिडक्या स्वरांत म्हणाला, " हें असं का, याचा कांहीं तरी सुगावा सांपडावा,...म्हणून हल्लीं मी सायकॉलॉजीचीं पुस्तकांमागून पुस्तकंहि वाचूं लागलोय् !– "

क्षणभर फुटलेली हास्याची उकळी दडपून,... मी म्हणालों, " त्यांत रे काय आश्चर्य करण्यासारखं ?– घरोघर चित्रकला मोठ्या प्रमाणांत सुरू व्हावी म्हणून तुमच्या किर्लोस्करांत ते कुळकर्णी का कोण प्रयत्न करीतच आहेत ना ? त्याचं यशस्वी प्रत्यंतर आहे नाहीं का हें ? "

— १० —

" होऽ ! या त्याच्या वाचनाच्या नव्या नादाल हि अनेक फाटे फुटूं लागले आहेत, अलीकडे !– " संपादक अगदीं निर्जीव हंसत, क्षणभरानें कडवट तोंड करून म्हणाला–" लेखनाला मज्जाव झाल्यामुळें, तो निमूटपणें वाचूं लागला खरा; पण ' सब्लिमेशन ', ' कॉम्पेन्सेशन ' काय काय म्हणतां ना तुम्ही,...त्या पद्धतीनें, सुरवातीला त्यानें फुटपाथवरचीं ' हरिविजय ', ' संतलीला ' वगैरे पुस्तकं नि रामपंचायतनाचीं वगैरे चित्रं स्वतःच्या पैशानें खरेदी करायचा सपाटा सुरू केला...."

"अस्सं ऽ ? तरीऽच ! समोरचं हें रामपंचायतन त्याचंच तर मग ?"

"हं ! तेंच सांगतोंय्" संपादक पुढें म्हणाला-"या खोलींत चित्रं नाहींत, म्हणून पहिल्या दिवशीं, अगदीं इथं मध्यावर त्यानें हें रामपंचायतन लटकवलं; मी हळूंच तें आंतल्या खोलींतील एका कोपऱ्यांत जमिनीवर ठेवून दिलं. पण दुसऱ्या दिवशीं, तें पुन्हां आपलं इथं भिंतीवरच ! तो बाहेर कामासाठीं गेला; मी पुन्हां आंतल्या खोलींत एका कोपऱ्यांत खिळा मारून तें टांगलं !...पण

तिसऱ्याहि दिवशीं, फुलांच्या माळेसकट, माझ्या बसायच्या खोलींत, पहिल्या ठिकाणींच तें विराजलेलं! तेव्हां रागानें मी मन्याला खूप बोललों. पण थंड चेहऱ्यानें त्यावर तो (वर मागण्याच्या आवाजांत) मला म्हणाला, 'असूं द्या नाऽ,साहेब. मी विकत घेतलं आहे तें,...माझ्या पैशानं! चांगलं देवाचंच आहे कीं!'— त्याच्या शब्दांतील ती कातरता न् डोळ्यांतील ती बोलकी आर्द्रता पाहून, माझं तोंड एकदम बंदच झालं. मनांत म्हटलं मी, 'जाऊं द्या'! क्षुल्लक बाब!— त्यामागल्या त्याच्या रसरशीत भावना कशाला दुखवा उगाच?"

"वा: छाऽन् छाऽन्!—तूंहि महान् कवीच आहेस!!" मी मोठ्यानें हसून डोळे मिचकावले.

— ११ —

"आचरटपणा पुरे!— तूंरे आणखी निराळं काय केलं असतंस,... अशा वेळी?"—थोडा किरमिजी चेहरा करून तो म्हणाला "पण तूं म्हणतोस तेंहि एका अर्थी बरोबर!...त्या सवलतींचे न् सहानुभुतींचे परिणाम वाढतच गेले!— आंतली खोली आतां बघशील तर तिथं देवादिकांचं एक संमेलनच भरलेलं आहे!— आणि त्या त्याच्या धार्मिक वाचनाचा तरी काय प्रताप पहा!— त्याच्या निवृत्तीला प्रवृत्तीची एक नवीनच कलाटणी मिळाली एकदम! कांहीं दिवसांनी तो 'हरिविजयां'त चार आण्यांचं 'कोकशास्त्र' 'संतलीलें'त दोन आण्याचं 'समाजस्वास्थ्य'... असं दुहेरी वाचन वाचूं लागून, भ्रष्टाकार मात्र करूं लागला..."

आधीं मला हसूं आवरतच नव्हतं; पण संपादकहि खोट्या गांभीर्यानें तसं बोलतां बोलतां खुसखुसून हंसूं लागला.

"एवढ्यावरच थांबतं तरी पुरवतं!" पुढल्या कल्पनेनें येणारे हसूं मधेंच आंवरून तो म्हणाला—"पण नव्यानव्या वर्तमानपत्रांनीं त्याच्या आयुष्यांत एक मोठा हा:हाकारच उडवला. त्या पानापानांतून दिसणाऱ्या जाहिरातींचे ठसे त्याच्या हृदयांत खोल उठूं लागले—तो कासावीस झाला!"

थोडा वेळ आपल्याशींचे हंसत राहून, शेवटीं संपादक म्हणाला—"परवां दुपारीं मी जरा लौकर घरीं परतलों. मन्या नव्हता—तोंच, आमचा पोस्टमन एक व्ही. पी. घेऊन हंसत हंसत आला! कारण विचारलं तर,—म्हणाला— साहेब,

व्ही. पी.ऽ–तुमची नाहीं—मन्याची!... 'एकशें चौऱ्यांय्शी आसनांची'! सारखं चार दिवस विचारीत होता 'आली कां?... आली कां?"... सहा दिवसां-पूर्वी, पोस्टांत पत्र सॉर्ट करतांना, त्यानें अमृतसरला लिहिलेलं पत्र मला सांपडलं; असलीं पत्रं मी नेहमीं वाचतों. त्यांत त्यानें लिहिलं होतं, 'माझं लग्न झालं आहे. बायको माहेरीं गेली आहे...."

माझं हसूं मी आवरत आहे,...तोंच संपादक पुढें म्हणाला–"अरे...आमचा पोस्टमन मोठा चलाख न् चावट! त्यानेंच व्ही. पी. ची ती माहिती मन्याला सांगितली होती. आणि 'असल्या व्ही. प्या. आल्यावर त्याला देऊं नकोस' म्हणून मी त्याला त्या दिवशीं सांगितल्यावर तर,... त्यानें 'व्ही. पी. साहेबांकडे दिल्याचं' मन्याला सांगितलंय्!...त्यामुळें तर मन्याची स्थिति अधिकच केविलवाणी झालीय्! तोंड दाबून बुक्क्यांचा मारच त्याला! तो—"

आम्हीं दोघेहि पोट धरधरून हंसलों.

## – १२ –

"पण इतका वेळ गेला कुठं तुझा तो नायक–सख्या हरी!" चारी पांची सिगारेटी संपल्या, तरी अजून मन्या नाक्यावरून परत आला नाहींसं पाहून,...मी चुळबुळ करून म्हणालों.

"अरे सगळं असंऽच त्याचं!—" उठून इकडे तिकडे अस्वस्थ हालचाल करीत तो म्हणाला, "फारच कांटकसरी आहे वेडा!...सुरवातीला तर 'पांच आण्यांत व्हिक्टोरिया ठरवून आण' म्हटलं,...तर तो चार आण्यांत जमवण्यासाठीं एक तास भटके; आणि शेवटीं, पांच आण्यांतच ठरवली, तरी तो पुढें न् व्हिक्टो-रिया मागें,... अशी नाक्यापासून घरापर्यंत आपली वरात काढी...!— कारण मनांत भिती, कीं,... एखाद्या वेळीं आपण आंत बसलों तर सहा आणे मागेल, व्हिक्टोरियावाला!—"

बोलतां बोलतां एकदम आठवण होऊन, माझं व आपलं हंसूं दडपून तो म्हणाला—"पंधरवड्यापूर्वी वाण्याकडचा माल जरा वाईट आला;... म्हणून आम्हीं घरांत आपसांत तक्रार करत होतों. रागांत मनुष्य कमीअधिक बोलतो; मी म्हटलं, 'गल्लोगल्लीं किराण्यामालाचीं छप्पन दुकानं आहेत!' वगैरे...

त्यानंतर मी विसरलों तें. पण दुसऱ्या दिवशीं, वाण्याची अर्जीजीनें भरलेली लंबी-चवडी चिठ्ठी आली मला. त्यांत माफी...कैफियत सर्व कांहीं होतं. सुरवातीला 'तुमची चिठ्ठी पोंचली' असला मजकूर होता. मी तर त्या कोड्यानें सर्दच झालों. तेव्हां मग मन्याकडे चौकशी केली; त्यानें हळूंच प्रकाश पाडला. 'तुम्ही काल म्हणालांत, तेंच चिठ्ठीत मी लिहिलं न् दिलं—' खालीं माझी सहीहि त्यानें इंग्रजींत केली असेल, असा मला दाट संशय आला त्यावेळीं. पण त्यानें मात्र तेवढं सांगायचं टाळलं!"

— १३ —

आंतल्या खोलीच्या खिडक्या वाऱ्यानें खाडखाड वाजूं लागल्या; म्हणून संपादक तेवढ्यांत उठला न् आंत गेला. पण बाहेर यायला त्याला किंचित् उशीरच झाला. तेवढ्यांत आंतून त्याच्या मोठमोठ्यानें हंसण्याचाहि आवाज मला ऐकूं येऊं लागला.

मी उठून आंतल्या दाराशीं जात म्हणालों, "आतां हें वेड्यासारखं काय चालवलंय्स आणखी?—"

हसूं बाहेर फुटत नसल्यामुळं गोऱ्यामोऱ्या झालेल्या चेहऱ्यानें, मला घाईघाईनें खुणावून, अस्पष्ट शब्दांत तो म्हणत होता "ये! इकडे ये!—आमच्या कलावंतांचा हा नवा सचित्र साहित्यिक प्रयत्न पहा!—सकाळीं ही भिंत मीच स्वतःच्या हातानें साफ केली होती—आतां इथं काय दिसतं आहे पहा—!"

मी जवळ जाऊन पाहिलं. तिथं एका ओळींत, एका पुढं एक, हरणाचं, सूर्याचं आणि मोराचं अशीं चित्रं दिसत होतीं. पहिली आकृती अगदींच न समजण्यासारखी असल्यामुळें तिच्या पाठीवर अखेर बारीक अक्षरांत लिहिलं होतं— 'सुवर्णमृग!' पुढल्या सूर्याच्या व मोराच्या दोन आकृतींमध्यें 'राव' असं लिहिलं होतं. व मोराच्या आकृतीपुढें पिसाऱ्याला शेवटीं इंग्रजींतील मोठ्यांत मोठा A जोडला होता.

तरी मला कांहींच बोध होईना. मी संपादकाकडे गोंधळून पाहूं लागलों.

"अरेऽ खालचीं परिचित अक्षरं पहा—" तो खुदुखुदु हंसत म्हणाला.

प्रत्येक चित्राखालीं एक, याप्रमाणें खालीं 'M. S. M.' अशीं मोठीं

अक्षरं होतीं; आणि त्याखालीं पुन्हां— " मारीच ( मन्या ) सूर्यराव मोरे " असं सुवाच्य अक्षरांत स्पष्टीकरण होतं.

" रामायणाचं पारायण, बरं का, आमच्या मन्याचं, हें !–पुन्हां कविकल्पनाहि आहे त्यांत–आज बेटा सुवर्णमृग आहे तो ! " इति संपादक.

" माफ करा महाशय !—" मी खो खो हंसत होतों तरी म्हणालों, " तुम्हाला तो सुवर्णमृग ! पण जितक्या लौकर या मारीच राक्षसाच्या तावडींतून मी सुटेन, तेवढं मला बरं !— आपणच आतां बाहेर पडून सिगारेट विकत घेऊं या. चल–तो पडला असेल कोणा रामा गड्याच्या बाणाला बळी !—"

– १४ –

पण आम्हीं दारापर्यंत पोहोंचे तों, आतां मला पूर्ण परिचित झालेली ' एम्. एस्. एम्. ' गाडी, इतक्या उशीरा कां होईना, आमच्या स्टेशनांत शिरून समोरच उभी होती !

मन्याचा चेहरा अभिमानानें तळपत होता;...त्यावर विजयी स्मित होतं; हातांत पिवळं पाकीट होतं; पण ते जांभळटहि होतं !—

तोंच, धांपा टाकीत तो त्याच्या साहेबांना म्हणाला—" खूप दुकानं फिरलों. शेवटीं,...पलिकडच्या नाक्यावरल्या त्या विडीवाल्याच्या गादीवर दीड आन्याला हें ' गोल फेक् ' मिलल् ! पिवळं पाकीट हाय् बगा. आन् तुमीं म्हणत होता, साहेब, कमी किमतींत नाईऽच मिलनार म्हनून !— "

तें ऐकून... नि त्यानें पुढं केलेली ती इंडियन ' गोल् फेक् ' पेटी पाहून, संपादक व मी दोघेहि एकदमच मूर्च्छित होऊन पडायचे !— पण...

– १५ –

पण–त्या नंतर संपादक महाशयांच्या घराच्या बाजूला मैलभराच्या टापूंत फिरण्याचं पुन्हां मी अजूनहि धाडस केलेलं नाहीं !—

त्या ' एम्. एस्. एम्. ' खालीं चेंगरायला होईलशी सारखी भीतीच वाटते, माझ्या मनाला !...

# तरणा म्हातारा ✶ १

" कारे पोरा, आपल्याशींच हंसत काय सुटलाहेस वेड्यासारखा ? " पाठीवर भय्यासाहेबांची परिचित थाप नि कानोवर ओळखीचा शब्द आदळला. मी हंसतां हंसतां दचकलों; तोंपर्यंत, आपल्या लांबरुंद ऑफिस-टेबलाला वळसा घालून, माझ्यासमोरच्या आपल्या उंच खुर्चीजवळ भय्याकाका हंसत उभे होते.

मानेजवळचं बटण तेवढंच लावलेला लांब पांढरा डगला, ताठ मान, गुबगुबीत गोरे गाल, घोसदार पांढऱ्या मिशा, उंच सरळ नाक, चमकणारे तीक्ष्ण डोळे, चांगलं चार साडेचार बोटं रुंद कपाळ !......

मघांपासून समोरच पडलेल्या भय्याकाकांच्या घामट टोपीकडे त्याचवेळीं पटकन् दृष्टि जाऊन,... मला पुन्हां हंसू लोटलं.

" माझ्या टोपीकडे पाहूनच हंसत होतास इतका वेळ ? " भय्याकाका बसतां बसतां खुदखुदले.

" नाहीं. इथं टोपी राहिल्यावर पहाणारांना काय दिसलं असेल याची कल्पना करीत होतों !– तिच्याच या उकळ्या ! " मीहि खुसखुसलों.

" लहान नाहीं, मोठं ऽ नाहीं;... अचरट पोरटीं ! " घामाघूम टकला-वरून रुमाल फिरवीत भय्याकाका म्हणाले. " नुसतं टक्कल नव्हे हें. चांगलं चार गांवचं पाणी प्यालेला भेजा आहे आंत !– टाळूवर नसतील केस; पण शेंडी, मिशी अनुभवानें पांढरी झाली आहे !– हेंच बघ आतां... "

आणि भेदक दृष्टि मजकडे लावून आंपल्या आतल्या खिशांतून रात्रींच्या ' मानापमाना ' ची तीन तिकिटं त्यांनीं काढलीं व माझ्यापुढं धरली--" ढमढेरे तूं न् मी !–आहेऽ ?– अरेऽ बाबा, ' जो दुसऱ्यावरी विश्वासला, त्याचा कार्य-भाग बुडाला !–' मला खात्रीच नव्हती तुम्ही. तडक तीनला बाहेर पडलों; थेट थेटरापर्यंत पोचलों नि आतां तिकिटं रिझर्व करूनच परततोय हा "—

दचकलोंच मी त्या पुराव्यानें नि स्पष्टीकरणानें !— माझी साधीसुधी कल्पना— ' खालच्या मजल्यावर भटजीकडे चहाची हुकी आली म्हणून भय्याकाका गेले असतील !'

" पण भय्याकाका, दरम्यान तुमची टोपी इथंच ? "

" हो तर मी नसतांना साहेबाला दिसायला. नेहमीप्रमाणें ' भटजीकडे चहाला गेलों ' असल्याचं, शिपाई जाणूनच होता. "

दाराजवळचे शिपायाचे मघांचे शब्द मला आठवले !--

" म्हातारपणीं हाताखालच्या लोकांना कामाचे धडे बरे देतां ! " हंसत हंसत त्यांना मी नवा चिमटा घेतला.

" अरे कावळ्यांनों वर्क व्हाइल यू वर्क, प्ले व्हाइल यू प्ले !- " भय्याकाका ड्रावरमध्यें कामाचे कागद टाकून, भरभर किल्ल्या लावत, पुढें हंसत म्हणाले, "तरुणपणीं एकदां मानेवर खडेहि ठेवून कामं केलीं आहेत बरंऽआम्हीं !-"

तोंच, घड्याळांत पांचाचे ठोके पडले. शिपायानें आणून दिलेली सेफची किल्ली खिशांत घालून, टेबलावरची टोपी डोक्यावर चढवींत, भय्याकाका उठून उभे राहिले;...आणि ऑफिसमध्यें चौफेर दृष्टि टाकून त्यांनीं कारकून मंडळीला पुकारलं, "झाली ना रेऽसारीं आजचीं महत्त्वाचीं कामंऽ? चला, चढवा टोप्या डोक्यावर !— पांचापुढें कंपनीचा पगार नाहीं चालू तुम्हांला ! आहे ना लक्षांत!–"

"हं चऽल... आतांऽमोकळे झालों आपण......ढमढेरेकडेच आधीं जाऊं नाटकाविषयीं सांगायला." भय्याकाका टेबलाजवळून लगबगीनें पुढं चालूं लागत म्हणाले– "नाहींतर...आपली पोरगी घेऊन फिरायला जायचा तो ! "

तरी पण दारापर्यंत पोंचेतों भय्याकाकांच्या मेलगाडीनें मालगाडीप्रमाणें प्रत्येक कारकुनाच्या टेबलापाशीं स्टेशन घेतलं होतं. त्यांच्या हाताखालचीं मंडळीहि कोट–टोपी चढवीत होती;नि अगदीं खेळीमेळीनें हंसत हंसतच भय्या-काकांशीं ऑफिसच्या कामाविषयीं व इतर प्रश्नोत्तरं करीत होती !—

सामान्यतः दुसऱ्या ऑफिसांमधें न दिसणारा तो न्यारा देखावा पाहून, मला तरी मनांत खूपच गंमत वाटत होती ! तरी मी जिने उतरता उतरतां भय्या-काकांना मुद्दाम डिंवचलं– " कारकून मंडळीनें तर तुम्हांला अगदीं खुंटीला टांगूनच ठेवलय. भय्याकाकाऽ "...

"अच्चाऽ आहेस, बेटा..." भय्याकाका थोडे गंभीर होऊन म्हणाले, "कोणी आपल्याला घाबरायला रे कशाला पाहिजे आहे ? आपआपसांत अशी दिलजमाई न् विश्वासच पाहिजे !— चुका झाल्या कोणाच्या यदाकदाचित्, तर त्याला जोडून आलेली जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेण्याची धमक मात्र पाहिजे अंगांत !— अरेऽ, गोऱ्या साहेबाची कुत्रीं होण्यापेक्षां हेंऽबरं !— लांगूलचालनाच्या जोरावर, मऊ गाद्यागिरद्या मिळतात क्षणभर लोळायला !— पण वेळप्रसंगीं, असलीं समर्थांचीं श्वानं निकामीं किंवा वेडीं ठरलीं, तर त्यांना विषाची भाकरी नाहींतर बंदुकीच्या गोळ्या खाऊनच मरावंहि लागतं !— हें नीट लक्ष्यांत ठेऊनच, जातभाईशीं वागावं, माणसानं !—"

— २ —

ऐन तारुण्यांत नोकरी-संसाराला जखडलेले आमचे भय्याकाका !— आतां आयुष्याच्या उताराच्या वेळीं, थोडी उसंत मिळतांच, आपला वयस्कपणा नि अधिकार विसरून, दिवसेंदिवस, (अगदीं असामान्य उत्साहानें) तरुणच होत चालले होते. जबाबदारीच्या दिवसांत जबाबदारी पेललेलं त्यांचं डोकं आणि त्यावरचे तुरळक रुपेरी केस, पांढऱ्या फेट्यांत गुंढाळून ठेवून, (मुलं कर्तींसवरतीं होऊन संसाराचा गाडा हांकूं लागतांच) एक न्यारीच विरक्तता त्यांनी आपल्या अंगांत बाणून घेतली होती. पेन्शनीची वेळ आली—किंबहुना होऊनहि गेली होती—तरी आमच्यासारख्या हिरवट तरुणांचा कंपू करून, त्यांच्या बैठकींत, (पान तंबाखूचे वार भरत, बिडी-सिगारेटीचे धूर सोडीत, सिनेमा-नाटकं-कादंबऱ्यांच्या गप्पा मारीत) ते एखाद्या जवान तरुणाचं आयुष्य जगत होते !

आणि आपल्या मनाचे तर भय्याकाकांनीं हल्लीं दोन कप्पे केले होते. भोंवतालचा जमाव पाहूनच ते वागत,...बोलत,...हंसत. एवढंच काय, पण त्यांचे पोषाखहि हल्लीं दोन प्रकारचे झाले होते. दुमडलेली टोपी टक्कलावर चढवली, कीं, ते तरुण होत. त्यांच्या म्हाताऱ्या शरिरानें पांढरं उपरणं नि पांढरा फेटा धारण केला कीं ते म्हातारे होत. तरी पण, त्यांच्या डोक्यावर बहुतेक टोपीच सांपडायची; आणि भोंवतीं आमच्यासारखे तरुणच असायचे !—

म्हणजे आमच्या तरुणांच्या घोळक्यांत ते फक्त टोपीच घालून फिरत, असंही नाहीं. मात्र, ज्यावेळीं, फेटा बांधून आमच्याबरोबर ते येत, त्या वेळीं त्यामागं त्यांचा

कांहींतरी खंवचटपणा नक्कीच असायचा;...आणि भल्या मोठ्या फेऱ्याच्या, गंभीर सुरकुतलेल्या चेहऱ्याच्या नि पांढऱ्या केसांच्या आपल्या निसर्गदत्त भांडवलावर, अशावेळीं, आमच्यासाठीं कांहीं तरी निरुपद्रवी नाविन्याची मेजवानी त्यांनीं तयार केलीच, म्हणून समजावं !—

भय्याकाकांचे नातूच आतां कॉलेजच्या आवारांत वावरूं लागले होते. तरीं चार सहा वर्षांचाच त्यापुढला पल्ला गांठलेल्या आमच्यासारख्या पोरांच्या खांद्यावर हात टाकून भय्याआजोबा फिरणार, किंवा आम्हां पोरांना घेऊन फिरायला जायला ऑफिसांतून तडक आमच्या कॉलेजांत एम. ए.--एम. एस्‌सी च्या वर्गांच्या चौकशा करींत व्हरांड्यांतून भटकणार!...मग भय्याकाकांचा त्या नातवांना धाक तरी कसा वाटावा ?

पण या बाबतींत भय्याकाकाचं ठाम मत होतं; ते म्हणत " अरे, कोणी कोणाच्या भीतीनें चांगलं न् वाईट होत नाहीं. बांधली शिदोरी काय कामाची ? ज्याचं तो आपलं आयुष्य घडवतो. मग या भय्याआजोबाचे डोळे पांढरे व्हायची न् मिटायची वेळ आली तरी पोरांसोरांना त्यानें डोळे वटारण्यांत अर्थ काय ? "

— ३ —

तसं अनिर्बंध वावरायला मिळावं, म्हणून ...मुलांनीं बांधलेल्या घराची तळमजल्यावरील अगदीं पुढली खोली त्यांनी स्वतंत्रपणें आपल्या ताब्यांत ठेवली होती. एका कोपऱ्यांत झोपायाचा मऊ बिछाना;...दुसऱ्या कोपऱ्यांत गार पाण्यानें सदा तुडुंब भरलेलं मडकं;...तिसऱ्या कोपऱ्यांत आपल्या आवडीनिवडीच्या इंग्रजी मराठी पुस्तकांनीं भरलेलं कपाट नि टेबल;...मध्यभागींच्या वाटोळ्या टेबलावर कळीदार चुना-पान-तंबाखूनें भरलेलं चकचकीत पितळी तबक;....असा सारा त्यांचा थाट असे!—

आतां प्रश्न पडे, तो दाराला कडी नांवाची चीज असे त्याचा व रात्रींच्या जेवणाचा ! तेंव्हा शेवटीं, कल्पक भय्याकाकांनीं रात्रीं जेवायचंच नाहीं हा नियम केला; नि आंतून लावलेली दाराची कडी बाहेरून अलगद उघडण्याची कौशल्यपूर्ण ' यांत्रिक व्यवस्था ' तयार करून ठेवली ! सुतानें ( आपल्या म्हातारपणच्या स्वातंत्र्याचा ) असा स्वर्ग गांठला !—

हा त्यांचा निरुपद्रवी हिरवटपणा घरांतील साऱ्यांच्या परिचयाचाच झाला होता. आणि नाहीं म्हटलं, तरी ( आपल्या सत्तेच्या म्हाताऱ्या बायकोवर व निदान घरांतील मोठ्या मंडळींवर तरी ) त्यांचा चांगलाच वचक होता.

इतक्या कडेकोट बंदोबस्तानंतर, आम्हा पोरांबरोबर, रात्रींबेरात्रीं, कोणत्याहि मोहिमेवर निघायला भय्याकाका नेहमीं तयार असत. एव्हढंच नव्हे तर स्वतःच पुढाकार घेऊन, ते अक्कलहुशारीनें त्या शीरसलामत पार पाडीत.

या त्यांच्या न्याऱ्या कार्यक्रमाबद्दल एकदां भय्याकाका मला म्हणाले— " तरुणपणीं दाखवायचा तो बाणेदारपणा तरुणपणीं दाखवला; कामाची नेकीहि दाखवली; आतां म्हातारपणीं थोडी मौज तरी करून घेतली पाहिजे, नाहीं ऽ रे? हे बघ, आमचा मधू टी. डी. होऊन आल्यावर लगेच इन्स्पेक्टर झाला. बाळूची वकिलीहि आतां चांगलीच चालली आहे. पोरींच्या पोरींचीहि लग्नं होऊन आपापल्या घरीं त्या नांदू लागल्या! बरं ऽ, आमच्या म्हातारीचं लक्ष तर आतां आपल्या नवऱ्यापेक्षां नातवांकडेच अधिक वळलंय्! मग घरांत आतां विचारतो रे कोऽण आम्हाला? येऊन जाऊन ही नोकरी जाणार, चुका झाल्या तर! पण ती तरी कसची जाते, म्हणा! साठी जवळ आलों, तरी धोरणी साहेब घरीं कांहीं बसायला देत नाहीं मला. तेव्हां मग् करतोय् असले हे पोरखेळ सगळे !— ऑफिसांतील हाताखालचीं सरावलेलीं पोरं तर कांहीं कामच पडूं देत नाहींत मला. तेव्हां मग उरले चार दिवस मजा तरी कां करूं नये आम्हीं, सांग ?"

आजचा हा नाटकाचा बेत खरा भय्याकाकांचाच! 'गंधर्वाची ऐश्वर्याची भूमिका!' आमची थट्टा चाले. कदाचित्, आम्ही त्याबावत दिरंगाई करूं, या कल्पनेनेंच भय्याकाकांचा जीव दुपारभर धडपडत होता. शेवटीं तीन तिकीटं खिशांत पडल्याबरच कुठं हायसं वाटलं असेल त्यांना अगदीं!

अशावेळचं आमचं हें त्रिकूट नेहमीचंच ठरलेलं; भय्याकाका, मी आणि ढमढेरे! ढमढेरे गेल्या वर्षीं आमच्यामध्यें प्रथम सामील झाला; नि तेव्हांपासून आमच्या या नाटक कंपनीचे कार्यक्रम अव्याहत चालू होते.

— ४ —

हो, तो दीडवर्षांपूर्वीचा प्रसंगहि तसाच गमतीचा! भय्याकाकांचे न्यारे प्रताप त्या दिवशीं ढमढेऱ्याला प्रथम नि प्रत्यक्षच समजले. पण ते समजल्यावरच त्याची न् भय्याकाकांची तत्काळ जानी दोस्ती झाली!— आणि आमच्या त्या

'भरमसाट मंडळा'चा तो तिसऱ्याच दिवशीं तहहयात सभासद झाला.

आठवण होतांच, आतांपर्यंत आम्हांला हजारदां हसवणारी ती गंमत अशी— सुटी होती, भर दुपारीं आम्हीं एकदोघे जण भय्याकाकांसह गांव भटकत होतों. गांवाच्या एका टोंकाजवळ आम्हीं बोलत बोलत पोंचलों; तोंच कल्पना नसतां वळवाचा पाऊस खूप गळूं लागला. अगदीं पाण्यानें निथळत, एका झाडाच्या आडोशाला आम्ही उभे राहिलों —

समोर आम्हांला एक घर दिसत होतं; दारांत पाटीहि होती कोणाचीशी. मी मुद्दामच भय्याकाकांना डिवचलं—" हिंमत असेल तर त्या घरांत आम्हांला निवाऱ्याला नेऊन बसवा, भय्याकाका! अगदीं मृच्छकटिकाचा सीन चाललाच आहे;— तेव्हां कोणीं चहा देईल तर तोहि पाहिजे आहे, यावेळीं !-"

कोणाच्या छत्रीवर बाहेरून नांव दिसलं, कीं, भय्याकाकांच्या पोरकटपणाला नेहमीं उकळी येई. ' कांहोऽ बळवंतराव ! काहोऽ बाबुराव ! ' करीत त्याला थांबवून पूर्वीच्या [ काल्पनिक ] ओळखीच्या दिलचस्प गप्पा त्याच्याशीं मारायचा मोका साधल्याशिवाय भय्याकाका कधींच राहत नसत. त्या नवख्या माणसाचा त्यावेळचा एकंदर गोंधळलेला चेहरा व पोषाख पाहून भय्याकाकांची कल्पनाशक्ति अगदीं चौखुर धांवायची हें नक्की ठरलेलंच. म्हणूनच तर भय्याकाकांना मी तो हळूच चिमटा काढला होता.

" अरेऽ मग त्याला कुणाच्या बापाची भीति कां आहे? चला कीं माझ्या मागून..." अपेक्षेप्रमाणें, व आपल्या स्वभावानुसार भय्याकाकांनीं हें माझं आव्हान तसं स्वीकारलं नसतं तरच नवल.

मग भय्याकाकांच्या मागून भिजत भिजत त्या घराच्या फाटकाजवळ जाऊन लटकलेल्या पाटीवर आम्ही पाहिलं !—लहानशीं अक्षरं होतीं !— ' मोहन माधव ढमढेरे, बी. ए. '

भय्याकाकांना मिशींतल्या मिशींत हंसतांना पाहून मी हळूच नवा सुरुंग भरला— " भय्याकाका, ओळख आहे कीं काय, तुमची-यांची? कोऽण आहे तो, तरणा कीं म्हातारा?"

" करायच्यात् रेऽकाय तुम्हांला चांभारचौकशा? ओळख काय कोण जन्मत:च घेऊन येतो,.. थोडाच?..." भय्याकाका हंसून म्हणाले, "चलाऽगप-

चूप माझ्या मागून या. "

" पण भय्याकाकाऽ" घुटमळून चांचरल्या आवाजानें मागें पावलें टाकीत आम्हीं एकदम म्हणालों—

" अहाऽरे भागुबाईऽ ऽ"... आम्हांला हिणवत भय्याकाका पुढं चालत गेले; त्यांनीं तें दार लोटलं;... क्षणभर कानोसा घेतला; नि आंत डोकावून, पोक्त आवाजांत म्हटलं– "अंऽ अरे मोहन ढमढेरे आहे कां घरांत?"

आमची तर छाती धडधडली; अगदीं एकेरी नांवानें अनोळखी ठिकाणीं सुरवात! नसत्या चौकशा! मारामारी होण्याचाच तो प्रसंग!

तोंच, विशीची एक मोहक तरुणी ओचेपदर सांवरत दाराजवळ येऊन म्हणाली– " नाहीऽ... बाहेर गेले आहेत शिकवणीला ते "...

ता वरून ताकभात जाणणाऱ्या भय्याकाकांनीं लगेच धोरण बांधलं; नि आपला फेटा हातांत काढून घेत आमच्याकडे पहात म्हटलं–" असं कां? बरं बरं, यारेऽपोरांनोंऽ... आंत तो येईलच इतक्यांत– "

आमचा तर श्वासोच्छवास वाढतच होता; पण भय्याकाकांनीं मात्र चटकन् समोरच्या झोंपाळयावर बसकणहि घेतली!...

— ५ —

सौ. ढमढेरे विनयशीलपणें आंत गेल्यावर, आमच्याकडे पाहून, भय्याकाका एकदां मिस्किलपणें गालांतच हंसले. निं आपल्या ओल्या झालेल्या टकलावरून धोतराचा सोगा फिरवीत, आंतल्या बाजूला वळून अगदीं घरगुती प्रेमळ आवाजानें ते म्हणाले, " बाऽळ, जराऽ टॉवेल आण पाहूंऽ बाहेऽर! हा पाऊस शिंचा मधेंच कसा उपटला पहा. हवेंत गारठाहि वाढला पटकन्. म्हातारपणीं सोसायचं नाहीं हें आतां आम्हांला..."

आम्हीं गोंधळलों होतों; पण भय्याकाकांच्या अपेक्षेप्रमाणें 'ढमढेऱ्यांच्या तिनें' लागलेच हंसतमुखानें झोंपाळ्यावर टॉवेल आणूनही ठेवला.

— पुढील एक मिनिटभर भय्याकाका ढमढेऱ्यांच्या टॉवेलानें निमूटपणेंच आपलं म्हातारं टक्कल सशास्त्र पुसत व शेंडी स्वैरपणें झाडत बसले होते.

आतां मात्र आमचं हसूं बांध फोडण्याचा प्रयत्न करीत होतं;... पण तेवढ्यांत आंतल्या दारांतून भय्याकाकांच्या नातसुनेला शोभेल असा आदबशीर मंजुळ आवाज आला— " चहा टाकते हं झटकन्... "

" चहाऽ ? अग कशाऽलाऽ ? बरं बरं कऽर " भय्याकाका वात्सल्यानें आंत पाहत म्हणाले–" हंऽ कसंऽ काय ? ठीक चाललं आहे ना तुमचंऽ ? "

" होऽ "–ती लाजून म्हणाली नि आंत निघून गेली.

तेवढ्यांतच, मिस्किल भय्याकाकांनीं आपली छाती अभिमानानें फुगल्या-सारखी दाखवली; नि आम्हाला टुक् टुक् केलं, हळूंच...

येथपर्यंतचं भय्याकाकांचं धाडस तर कमालीचंच होतं. पण मग आतां त्याचा शेवट ? तेवढ्यांतच श्री. ढमढेरे आले तर पारडं नक्कीच उलटायच !...तेव्हां सचिंत दृष्टी दाराबाहेर लावून, मी हळूंच येरझारा घालूं लागलों. तोंच, रस्त्याच्या लांबच्या टोंकाकडून एक तरणा सायकलस्वार येतांना दिसला; माझी तर घाबर-गुंडीच उडाली. पण ती चलबिचल तशीच प्रयासानें आंतल्या आंत दडपून, भय्याकाकांना मी डोळ्यानें खूण केली.

तेवढ्यांतच–चहाचे कप आदबीनें झोंपाळ्यावर ठेऊन ' ढमढेऱ्यांच्या तिनें ' दाराबाहेर पहात म्हणलं–" हे आलेऽच वाटतंऽ !"

" कोणऽ ?...मोहन आला कां ?–" चहाचा कप तोंडाला लावतां लावतां तरीहि भय्याकाकांच्या तोंडून बेडरपणें संथ उद्गार बाहेर पडले !– आणि भांबा-वल्या नजरेनें समोरच्या प्रकाराकडे पहात, मोहनरावजी आंत शिरतांना दिसत असूनहि. भय्याकाका त्यांना मोघमपणें हंसून म्हणाले, " यावंऽ यावंऽ!- आतां कुठून आली स्वारीऽ, भिजऽत ? "

— ६ —

अनोळखी घरमालकाचंच प्रत्यक्ष भय्याकाका तसं स्वागत करतांना पाहून आम्हाला मात्र हंसावं कीं रडावं तेंच समजेना !... अगदीं बांकाच वखत.

पण घरांत बायकोकडे व आम्हां सर्वांकडे पहात, गोंधळल्या नजरेनें हंसण्याचा प्रयत्न करीत, ( माफीच्या साक्षीदाराच्या आवाजांत ) ढमढेरे म्हणाला, "दोन शिकवण्या संपवून आलों सकाळच्या; उशीरच झाला थोडा"–

" तिचा मामा व त्याचा मामा " या गोष्टीसारखीच श्री. व सौ. ढमढे-ऱ्यांची स्थिति झाली होती ! सौ. तेवढ्यांतच आंत गेल्याचा मोका साधून भय्या-काका हळूंच पण शांतपणें म्हणाले "मला ओळखलं नाहींस वाटतं ! अरेऽ आपला ए. इन्स्पेक्टर सोहनी ... तो माझाच मुलगा !... "

भय्याकाकांनीं धोरणानें वेळींच ती रामबाण जडीबुट्टी वापरली होती. कारण, गोंधळले ढमढेरे तें ऐकून प्रथम चमकले, नंतर त्यांचा हसतमुख चेहरा पालटला;.. ...आणि मग ते लागलीच अदबीनें म्हणाले "अरेऽ...कल्पनाहि नव्हती ... आमच्यासारख्यांच्याकडे असे अचानक यालशी...'

"सिटी स्कूलमध्येंच असतोस ना ?..." रिकामा कप खाली ठेवीत भय्याकाका सहाजोगपणें उद्गारले.

"होऽ !... दोन वर्षं झालीं !" भय्याकाकांचा क्षणापूर्वींचा अनमानधपका तत्काळ अगदीं शंभर टक्के खराखुरा ठरला होता...

तेंऽच ! " आमच्या शेजाऱ्यांचा मुलगा तुझ्या शिकवण्याची फार स्तुती करतो ! भय्याकाका आतां अधिकच शफारले " काय रे ऽ? एस्. टी. सी. वगैरे झालास ना !—"

"नाहीं...जमलंऽच नाहीं अजून तें !—" मोहन ढमेढेरे संकोची आवाजांत म्हणाला.

"म्हणजेऽ ?...असं कां बरं ?..." पाठीवर हात फिरवण्याच्या आवाजांत भय्यासाहेब पुढें म्हणाले, " नाहीं तर असं-कर... पुढल्या वर्षी तूं बी. टी. लाच जाऊन ये !...मी मधूला सांगतों ॲडमीशन वगैरेची सारी व्यवस्था करायला ! ...अं ऽ ! कसंऽम्हणतोस ?"

त्याक्षणीं भय्याकाका ढमढेऱ्यांच्या घरीं एखाद्या देवदूताचं काम करीत होते ! —नव्या लगबगीनें मोहनराव एकदम म्हणाले, "सुम ऽ न, फराळाचं नाहीं आणायचं कांहीं !— नुसता चहा ग काय दिलास त्यांना ?"

"अरे नको नको ! " भय्याकाका थोडक्यात थांववण्यासाठीं झोपळ्यावरून उठून, पोक्तपणें फेटा गुंडाळीत म्हणाले— " गेलं पाहिजे रेऽ मला !– आणि पाऊसहि ओसरला आतां! —या पोरांबरोबर फिरायला निघालों होतो; तेवढ्यांत कोणी म्हणालं इथं ते ढमढेरे मास्तर रहातात "...तेव्हां म्हटलं– ' चला.. जाऊं या ' – बरं तर. . निघतों ... माझ्या आहे हं ऽ मधाचं सारं ऽ लक्षांत. काळजी नको त्याची !—"

आणि बाहेर पडतां पडतां, घरांत उभ्या असलेल्या सौ. सुमन ढमढेरेकडे पुन्हां वळून पहात भय्याकाका हंसून म्हणाले—"बरं बाळ !–येतो हं आम्हीं!–"

ढमढेऱ्यांच्या घरापासून फर्लांगभर दूर जाईपर्यंत, आम्हीं आमचे जीव अक्षरशः मुठींत धरून चाललों होतों—आणि नंतर पोट धरधरून हंसतां हंसतां जीव बेजार झाला होता!... गंभीरपणें मनुष्यस्वभावज्ञानाबद्दलचं लेक्चर पाजत, अखेर भय्याकाकाहि आमच्या हंसण्यांत सामील झाले होते!

—७—

दुपारीं ठरल्याप्रमाणें, आम्ही नाटकाला गेलों; पिस्ते-शेंगदाणे-गंडेऱ्या खात नाटक पाहिलं; रस्ताभर पाहिलेल्या नाटकावर, म्हाताऱ्या बालगंधर्व धैर्यधरावर व नाटकांतील इतर पात्रांवर काव्य-शास्त्र-विनोदी गप्पा छाटल्या...

शेवटीं, दोन वाजण्याच्या सुमाराला भय्याकाकांच्या खोलीपाशीं आम्हीं चोरपावलांनीं येऊन उभे राहिलों.

पण सर्वांनीं खोलींत जाऊन पानाचे बार भरावेत व मग आपापल्या अंगणांत जाऊन झोपावं, असा भय्याकाकांनींच बूट काढला!

आम्हाला खुणेनें गप्प बसवून, भय्याकाकांनीं रिवाजाप्रमाणें बाहेरूनच दाराची आंतली कडी काढली. काळोखांत वांवरतच आम्ही माठांतलं गार पाणी प्यालों; भय्याकाकांनीं पानाचं तबक अलगद उचलून, हळूच समोर ठेवलं!—पानाच्या शिरा काढून तीन विड्यांसाठीं मालमसाला घातला. पण सुपारी कातरायचा अडकित्ता कांहीं तबकांत सांपडेना.

'काकी पान खातात' या धोरणानें भय्याकाका हळूच कुजवुजून आम्हांला म्हणाले—"थांबा हंऽ! चिडीमिडीऽ चूप!...तिनें आंत नेला असेल अडकित्ता; मी अगदीं मांजराऽच्या पावलानें जाऊन घेऊन येतों तो, झोपाळ्यावरून..."

आमची छाती धडधडत होती. तोंडांना कुलुपं घालून नि जीव मुठींत धरून आंत गेलेल्या शूर भय्याकाकांच्या परतण्याची आम्ही वाट पहात होतो. एक, दोन, तीन मिनिटं अशींच उत्सुकतेंत गेलीं!

तोंच... कानठळ्या बसवणारा एक भयंकर आवाज घरांतून आला!

आणि मग चौफेर एकच गोंधळहि उडाला. झोपाळ्या शेजारच्याच खोलींत, काकी...चार खोल्या टाकून इन्स्पेक्टर, मागल्या खोलींत वकील आणि माडीवर भय्याकाकांची नातवंडं झोपत असत. तेव्हां वरून नि चारी बाजूंनीं निरनिराळ्या आवाजांत साद-पडसाद ऐकूं येऊं लागले—"अरे कोऽण?..." "कोऽण?"... "कोऽण??—"

क्षणभर दुसरा आवाज कांहींच ऐकूं येत नव्हता. पण शेवटीं, भय्या-काकांनीं उभ्या जागेहूनच स्पष्टीकरणार्थ अधिकारी स्वरांत पुकार केला, "कुणी नाहीं रेऽ कुणी नाहीं !... झोंपाऽ तुम्हीं गप्प !... मीऽभय्याऽच तो !! इथं अडकित्ता घ्यायला येत होतों;...पोरट्यांनीं झोंपाळ्यावर बुडकुल्या–बाहुल्यांचा डबा ठेवला होता; आणि खालींऽ रिकामं पातेऽलं होतं;...समजलंऽ ?...झोंपा आतां..."

आम्ही आपलं प्रयासानें हसूं दडपत आहोंत, तोंच भय्याकाका अडकित्ता घेऊन काळोखांतून आमच्या समोर प्रकटहि झाले.

सुपारी कातरतां कातरतां ते आम्हांला कुजबुजत दरडावत म्हणाले, "चुपारेऽ कारट्यांऽनों ! हंसायला काय झालं ? पाहिलं, पण शिंचं हें असंऽ होतं एकेकदां ! रात्रीं साडेदहा अकरालाच येऊन झोंपलों, असं आतां सकाळीं म्हणायची सोयच उरली नाहीं !...आणि पुन्हांऽ, म्हातारा रात्रींऽचा वावरतो कशाला घरांतून– झोंपाळ्याजवळून, असा नाहीं तो आळ यायचा पिकल्या केसांवर ! मोठी आफत आली आतां—"

कसेबसे पानाचे तोबरे तोंडांत कोंबून, शक्य तितक्या लौकर आम्ही रस्ता गांठला. आम्हाला उकळ्यांवर उकळ्या फुटत होत्या. अनावरच हसूं लोटत होतं...

— ८ —

असले म्हातारपणचे तरणे चाळे म्हणजे आपलेहि 'सत्याचे प्रयोग' च आहेत, असं भय्याकाका आम्हांला नेहमीं म्हणतात. तेव्हां, 'पुढं आणखी किती दिवस ते चालणार ?' असं विचारतांच, त्यांनीं एका विनोदी प्राण्याचा एक जुना दाखला देऊन आम्हाला सांगितलं– "तक्याला ओढगून तो मेला... त्याच्या शेवटच्या प्रवासाची तयारी करतांना, त्याचे पाय खालीं केले कीं तो तिरडीवर उठून बसे,...नीट झोंपवला कीं पाय वर करून तो लोकांना लाथा मारी ! –माझंऽहि तसंच होणार, पोरांनोंऽ !–माझ्या स्मशान-यात्रेंतहि, तुम्ही सुतकी चेहरे करण्यापेक्षां, जगांत उरलेल्या अफाट आनंदाची जाणीव ठेऊन हसत रहावं, असंच कांहीं तरी मी करीन !"

आम्हाला त्यांची पुरेपूर खात्रीहि आहे !– पण भय्याकाकांच्या आनंदी खेळकरपणाचा नि विनोदाचा तो कळस पहाण्याचा प्रसंग निदान आमच्या शेवटापर्यंत तरी लांबला जावा, असंच आम्हा सर्वांना सारखं सारखं वाटतं !—

## रेडियो ★ १०

गडबडघाईच्या शहरीं–व्यवहारांतला, सुटीचा दिवस–म्हणजे स्वर्गसुखच!– ‘हुऽश्श’ करून रेडिओचं बटन दाबावं; आरामखुर्चीवर ऐसपैस पाय पसरावेत; त्या दिवसाच्या तारखेप्रमाणें व आपल्या एकंदर ऐपतीप्रमाणें कमीजास्ती किंमतीचा धूर सोडावा; स्वस्थ पडून रहावं, झोपावं किंवा आपल्या आवडीचं एखादं पुस्तक वाचत लोळावं.

त्या दिवशीं, मी माझ्या छोट्या घरकुलाच्या राज्यांत असलंच मोठं स्वर्ग-सुख अनुभवीत एकटा बसलों होतों. कालातीत वागण्याचा तो एकटाच दिवस! माझं घड्याळाकडेही लक्ष नव्हतं. माझे बेफिकीर डोळे हातांतील उलट्या पुस्तका-कडे होते, व कान रेडिओच्या बटन दाबल्यानंतरच्या सुरवातीच्या हुंकाराकडे लागले होते.

पण माझी निराशा झाली. त्या हुंकारांतून नेहमींचा रतीब घातल्यागत भूमीजनांना हांका मारणारा कंटाळवाणा ध्वनि एकदम प्रगट झाला—“हंऽ रान राऽम मंडळीऽ!...”

पूर्वानुभवामुळें माझ्या कपाळाला आंठ्या पडल्या.

मी तोंड फिरवतों, तों माझ्या सताड उघड्या असलेल्या दारांत एक परिचित काटकोळी व्यक्ति दिसली, व कानावर त्यांनीं मलाच उद्देशून मोठ्यानें उच्चारलेले शब्द आदळले—“हं... राम राऽम मंडळीऽ!—”

– २ –

जितक्या कंटाळवाण्या चेहऱ्यानें पहिल्या हांकेसरशीं मी तोंड बाजूस फिरवलं होतं, तितक्याच आनंदी, उत्साही, हंसतमुखानें दारांत उभ्या असलेल्या समोरलि व्यक्तीकडे मी आस्थेनें चालत गेलों. कारण...माझे बऱ्याच वर्षांचे स्नेही गजाभाऊ हंसतमुखानें मजकडे पहात उभे होते.

स्वारीच्या अव्याहत बोलण्यामुळें, रेडिओ नव्हता त्या काळापासून आम्ही त्यांना ‘ ग्रामोफोन ’ म्हणत आलों होतों. आणि आज रेडिओप्रमाणें ‘ राम राम मंडळी ! ’ म्हणतच ते किती दिवसांनीं माझ्या घरीं प्रकट होत होते. क्षणभर वाटलं,… “ यांचं जुनं नांव आतां टाकूं या. काळ वदलतोय् त्याप्रमाणें तें नांवहि बदलूं या. यांना आतां ‘ रेडिओ ’च म्हणूं या—”

असले तरल विचार माझ्या मनांतून सरकन् सरकून जात आहेत, तोंच गजाभाऊंची स्वारीच आंत सरकली व मी उठल्यामुळें रिकाम्या झालेल्या आराम-खुर्चीवर, मी सांगण्यापूर्वींच पसरली !

मला त्यांच्या या अनौपचारिक, सरळ, मोकळ्या वृत्तीनें मनापासून आनंद वाटला. अर्थात् तें कांहीं मला नवीन नव्हतं. त्यांना आम्ही ‘ग्रामोफोन’ म्हणत असूं, तरी त्यांची बडबड ( रस्त्यावरील हॉटेलाहॉटेलांतून होणाऱ्या ) दळूबाई किरकिरीसारखी आम्हांला खासच वाटत नसे ! किल्ली दिली कीं ते बोलत, पुष्कळ वेळ बोलत आणि कुठेंहि बोलत, एवढंच त्याच्यांत व ग्रामोफोनमध्यें साम्य होतं !—

पण त्यांची ही किल्ली मात्र यांत्रिक नव्हती. ती मानवी मनाच्या विचारांची असे. आणि ते नुसतेच बोलत नसत; जिवंत विचार बोलत असत; बोललेले विचार आचरणांत आणीत असत. निदान गेलीं पंधरा वर्षं तर मीं त्यांना पाहातच आलों होतों—

कॉलेजपर्यंतचं शिक्षण, जी. आय. पी. तली नोकरी, रुटूंघूटूं संसार, अगदीं दोन दोन वर्षांच्या अंतराचीं मुलं !–पण गजाभाऊंचे विचार मात्र खोड्यांत पड-लेले नव्हते. त्यांचं आचरण सांचलेल्या डबक्याप्रमाणें झालेलं नव्हतं. त्यांत संथ प्रवाह होता; छोटेमोठे धबधबे होते. अगदीं कड्यांच्या तोंडाशीं येऊन त्यांनीं खोल दरींत उड्याहि घेतल्या होत्या !

नाहींतर पहिल्या सात आठ वर्षांत सवाशेंपर्यंत चढत गेलेली ही स्वारी, रेल्वे कामगार संपाच्यावेळीं, बडतर्फ केलेल्या माणसांच्या यादींत पडली नसती. त्यांचा पूर्वींचा फेटा, लांब धोतर, सहा बटणांचा डगला जाऊन, त्यांऐवजीं रंगीत खादी टोपी, शर्टवरचं तीन खिशांचं जाकीट व गुडघ्याखालपर्यंतचं जाडंभरडं खादीधोतर, असा वेष आलाच नसता.

— ३ —

"काय रेडिओऽ चालला आहे वाटतंऽ?" इझिचेअरवर पडल्या पडल्या, आपल्या तीक्ष्ण डोळ्यांनीं माझ्याकडे पाहून ते म्हणाले व रेडिओकडेहि पाहूं लागले. त्याच वेळीं त्यांतून आवाज येत होता—"आतां आमचे एक कलाकार तुम्हांला गाणं म्हणून दाखवीत होते. यानंतर सुंदराबाईची लावणी ऐका— 'तूं नकोऽकरूंऽघाऽईऽऽ'."

पुढलं गाणं माझ्या कांहीं कानावर पडलं नाहीं. 'खट्' असा गजाभाऊनीं अंगचं बटण दावल्याचा आवाज मात्र झाला. आणि त्यांचा स्वतःचाच ग्रामोफोन— नव्हे रेडिओ—प्रस्तावना न करतां माझ्यापुढं एकदम सुरूं झाला. "हंऽ...! भूमिजनांचे कार्यक्रम...! हेऽच कां होऽ तुम्ही लोक करतां ते भूमीजनांचे उद्धार? आणि हेच दुबळे रेडिओ, तुम्हांला ज्ञान देणार, नि तुमची करमणूक करणार? हंऽ!... दुर्दैवच म्हणायचं! हल्लीं तुम्हां लोकांना आयतीं बटन तेवढीं दावतां येतात! पण नव्या ठिणग्या कांहीं पाडतां येत नाहींत!! विजेनें माणसं मरतात म्हणतात, तीं अशींच असतील कदाचित्...!"

गजाभाऊ आल्यापासून माझी आधींच त्यांच्याबद्दलच्या विचारांमुळें क्षणभर वाचा गेल्यासारखी झाली होती; त्यामुळें मी त्यांच्या असल्या तुटक येणाऱ्या वाक्यांनीं अधिकच मुकस्तंभ होऊन त्यांच्याकडे पाहूं लागलों.

इझिचेअरवरून उठून माझ्या टेबलावर अस्ताव्यस्त पडलेलीं पुस्तकं ते वरखालीं करीत होते. एका दोस्ताकडून मला भेट म्हणून आलेलं त्याचं नवीनच प्रसिद्ध झालेलं पुस्तक त्यांनीं हातीं घेतलं व त्याचीं पानं ते चाळूं लागले. आणि शेवटीं तें उघडं पुस्तक हातांत धरून ते माझ्या बाजूस वळले व म्हणाले, "आतां रेडिओचं पाहिलंच आपण! तुमचे लेखक तरी हल्लीं काऽय लिहितात रेऽ? त्यांना आम्हां साधारण माणसांना सांगायचं तरीऽ काय आहे? कीं छापखान्याचे दर म्हणतात कमी झाले आहेत, म्हणून हें वाङ्मय जागोजाग उगवतं?... पोटासाठीं—पण तेंहि खरं वाटत नाहीं—अस्वलं नाचवण्याची कसरत म्हणतात,... तसला तर कांहीं प्रकार नसेल ना हा...? या वरच्या चित्रावरून तर.. आमच्या स्त्रीपुरुषांना गळ्यांत गळे घालायच्या प्रेमाशिवाय दुसरा कोणता उद्योगच नाहीसं दिसतंय्... वाटतंय!— "

— ४ —

आजची गजाभाऊंची तुटक वाक्यांची ती पद्धति मला जरा निराळीच वाटत होती. आल्यापासून त्यांचं माझ्याकडून आगत–स्वागत झालं नसल्यामुळं व त्यांच्या त्या एकेरीच बोलण्यालाहि जरा खंड पडावा, म्हणून मी मध्येंच म्हणालों, "हें पहाऽ गजाभाऊऽ फार दिवसांनीं आज भेटताहां; आणि आल्या-बरोबरच अशीं हीं शस्त्रं कशाला पाजळतांहां आम्हां लोकांवर? चहा घेणार ना आधींऽ?—"

"'मी जन्मांत कधीं चहा घेतला नाहीं' असं सांगणाऱ्या बुद्रुकांमधला नव्हे मी—" गजाभाऊ किंचित हसून म्हणाले, "आणि आतां तिन्ही सांजेच्या वेळेलाहि, मुंबईंत चहाऽ विचारणं, ही तुझीऽ पण चूक नव्हे! पण वायकांना त्रास देऊन असले हे दांभिक उपचार आमचं जग आणखी किती दिवस पाळणार आहे रेऽ?–"

विषय पालटण्यासाठीं सोडलेली माझी गोळी माझ्यावरच उलटली होती! आतां या गजाभाऊंना थोपवावं तरी कसं?... अशा विचारांत मी म्हणालों, "पण गजाभाऊऽ, हें तुम्हीं आज सूत्रात्मक काय चालविलं आहे सारखं?—"

गजाभाऊ एकदां मोठमोठ्यानें हंसले. त्यांनीं तें पुस्तक टेबलावर ठेवलं व टेबलावरच आसनमांडी ठोकीत ते म्हणाले, "अरेऽ जग वायफळ वटवटच फाऽर करतंऽ! आम्हीं चार विचार अघळपघळपणें बोललों–तर आम्हीं तुम्हांला बोल-णारीं यंत्रं वाटतों; तेव्हांऽ या सूत्रात्मक पद्धतीचीऽ च आज जगाला जरुरी आहे, मला वाटतं! मात्र ती साधीं असावींत, अर्थपूर्ण असावींत होऽ!– 'ऋलृक् एओङ् ऐऔच् हयवरट्' अशींऽ नसावींत–म्हणजेऽ झालं!—"

बोलण्यांत अर्थ असावा, हें सांगण्यासाठीं बोलतां बोलता गजाभाऊ अर्थ-हीन व्याकरण–सूत्रांत शिरले, याची मला मौज वाटली. आणि त्या दृष्टीनें मी त्यांच्यांकडे पहात आहे, तोंच ते एकदम उभे राहिले व आपल्या जाकिटाच्या खिशांतून चार रुपये काढून त्यांनी माझ्यापुढें केले! आणि मग ते मला हळूच म्हणाले, "हं, हेऽ घे. मला आतां गेलंऽ पाहिजे. —"

मला तर त्याचा अर्थच समजेना; मी त्यांच्याकडे आश्चर्यानें टकमकां पाहूं लागलों!—

" अरे घेऽ! हे तुझेऽच पैसेऽ..." गजाभाऊ माझ्याकडे पाहून म्हणाले, " तिदस्तां आमचा धाकटा विनायक वगैरे आजारी होता, त्यावेळीं तूं आणून दिलेल्या औषधांच्या डब्यांचे हे ! बरेऽच दिवस देईन देईन म्हणतोय्; पण साडे-एकतीस रुपयांत शिंचं सारं भागत नाहीं रेऽ ! बरंऽ जाऊंऽ ?— मला परळला आठाला एका मिटींगला हजर रहावयाचं आहे. आणि युनियनचंहि महत्त्वाचं एक काम आहेच त्यानंतर —"

मी कांहीं बोलण्यापूर्वीच, चार रुपये टेबलावर ठेवून गजाभाऊ दारापर्यंत पोंचले होते. आणि मी कांहीं सांगण्यापूर्वीच ते म्हणाले–"वहिनी बाहेर गेलेली दिसतेय् ! बरंऽ,... येईन केव्हांतरी पुन्हांऽ ! बरंऽ मंडळीऽ ! चालूंऽ द्या तुमचा रेडिओऽ !..."

गजाभाऊ आज अनपेक्षित आले तसेच पटकन् गेले. त्यांनीं माझ्या खोलींतील रेडिओ बंद केला खरा; पण त्यांच्या त्या वेळच्या तुटक वाक्यांनीं, उघड्या सरळ वर्तनानें, माझ्या मनांत मात्र नवाच दांडगा रेडिओ तयार झाला होता; आणि त्यांत त्यांच्याबरोबर घडलेले अनेक पूर्वप्रसंग व त्यावेळची त्यांची ' बडबड '—त्यांतील अनेक वाक्यंच्या वाक्यंच जणुं— ( कुठल्या तरी ध्वनीलाटांची होणारी आकाशवाणी एकदम कानावर आदळावी त्याप्रमाणें —) माझ्या कर्णपटलावर येऊन आदळत होती !

— ५ —

माझ्या हातीं असलेल्या त्या चार रुपयांचा इतिहास प्रथम माझ्या डोळ्या-पुढें उभा राहिला.

गजाभाऊंचीं तीन मुलं त्यावेळीं सारखीं आजारी होतीं. वायकोची प्रकृतीहि बिघडली होती. स्वतःच्या परिस्थितींत सामावून घेणारे, निर्व्यसनी कांट-कसरी, असे गजाभाऊ !...तरी पण त्यावेळच्या तुटपुंज्या पगारांतच त्यांना ही घरांतील सुश्रूषा संभाळायची होती. वरळी चाळींतच संसार पसरून, त्यांनीं आपला नेहमींचा पसारा आटोक्यांत आणला होता. पण म्हणूनच तर एखाद्या आगंतुक पाहुण्यांप्रमाणेंच या आजारालाहि आपल्या घरांत जागा द्यावयाला त्यांना अवसर नव्हता.

मी एके दिवशीं सहज गेलों तेव्हां गजाभाऊ या आपल्या संसारी पसाऱ्यांत कपाळावर हात ठेवून गपचूप बसले होते. तेथील ती भयंकर परिस्थिती पाहून मी माझा एक डॉक्टर स्नेही तिथं गूपचूप नेला. त्याच्या उपचारानं त्यांचीं दोन मुलं मरतांमरतां उठलीं. तिसऱ्या दगावलेल्या छोट्या मुलीचं दुःख बाजूस सारून, ते कांहीं दिवसांनीं मजकडे येऊन, माझ्या हातीं भांडखोरपणें पंधरा-रुपये ठेवून गेले. डॉक्टरनें आपलं बिल पोंचलं, असं सांगितल्यामुळेंच, त्यांनीं मला हा दम भरला होता; आणि त्यावेळीं ते म्हणाले होते, “ अरेऽ हे प्राणी येताऽत; आपलीं कर्जऽ फेडून घेताऽत;... आणि माणसांना मात्र मोठ्या मनाचीं करून जाताऽत ! त्यांत त्यांचा दोष नाहीं,...तितकाच आमचाहि नाही. तुम्हीं आतांचीं नवीं शहाणीं माणसं—‘ संयमन ’ शिकवाल !...पण बाकीचंऽ हें कृत्रीम जीवन काय कमी झालंऽ आहे, तर आम्हीं असं ऽ जगायचं ? पुन्हां श्रीमंतीं ऽ सुखं ऽ तीं बाबा ऽ... आमच्या निर्धनांच्या निरुपयोगाचींच ! ”

त्यानंतर त्यावेळच्या माझ्या खर्चातले फ्लॉजेस्टिनवगैरेचे चार रुपये राहिले होते;... तेच आठवणीनें परत करावयास ते आज इतक्या दिवसांनीं माझ्या घरीं आले होत.

— ६ —

मध्येंहि दोनदां ते रस्त्यांत मला भेटले होते. कधीं बरं ?

एकदां दिल्लीला ( रेल्वेंत नव्यानें एक वर्षाची मिळणारी मोसमी नोकरी करण्यास ) जाण्याची ते तयारी करित असतांना !—

त्यावेळीं ते मला रस्त्यांत भेटले असतां म्हणाले होते, “अरेऽ...नोकरी कोण जन्मतःच घेऊन येतो आहे थोडीचऽ, वेड्याऽ?...माझ्या बरोबरचे आतां एकशेपंचायशीपर्यंत गेले आहेत. हंऽ...घाबरूं नकोस ! कारकुनीपद्धतीचं बोलणं नाहींऽ हेंऽ!...वस्तुस्थिति सांगितली आपली तुलाऽ! संप हुकला,...नोकरी गेली !...मध्यें एक वर्ष बेकारीतहि काढलं होतं; खादी फेरीच्या धंद्यांत रोज सहासात आणे मिळत !—बायको शिवण करायनी ! हमालीहि केली असती मी; पण शरिरांत ताकद नाहीं रेऽ!...मग मजूरांनींच शेवटीं पोट दिलं मला ! तीस रुपयांत भागवायचं असे !...आतां पूर्वीचा हक्क जाऊन नवीन अर्जांत माझं जें

नांव पडलं होतं....त्याचा नंबर लागलाय्!-पण पडलेले सैनिक बावा आम्ही–म्हणताईत ' पाहिजे तर दिल्लीला या; पंचेचाळीसानें सुरवात होईल. वर्षानंतर कदाचित् तुमच्या खर्चानेंच परत जावं लागेल.' जातों!... अरेऽ तेवढंच चार लोकांचं ओघानें झालेलं कर्जऽतरी फिटेल!...आल्यावर पुन्हां मजूर, नाहींतर आपली अखेरची बेकारी आहेच हक्काची...."

आणि त्याचप्रमाणें ते वर्षानें दिल्लीहून परतले होते. त्यावेळीं कुठं बरं भेटले होते ते मला?...होऽ...रस्त्यांत!...धोबीतलाव नाक्यावर ट्रामची वाट पहात उभा होतों मी... मला पाहिजे होती ती 'सहा नंबर' शेवटीं आली. पण त्यांतून गजाभाऊंची स्वारीच खाली उतरली. आणि रस्त्यांतच आम्ही त्यानंतर बोलत होतों.

मला वाटतं, एक, दोन, तीन...सतरा-अठरा तरी ट्रॅम माझ्या पुढून सरकल्या; पण गजाभाऊंचा 'ग्रामोफोन' रस्त्यांत सुरू झाला होता; आणि त्या दिवशीं तर त्यांतून पुष्कळच सुरेल स्वर निघाले होते!–

"ठरल्याप्रमाणें नोकरी सुटून दिल्लीहून नुकताच आलोंय्...पूर्वीच्या युनियनच्या कामांतच पडलों आहे पुन्हां आतां. आणि आमचं काम जोरांत चाललं आहे!...अरे ऽ, जग जोरांऽत पुढं चाललं आहे, यांत मुळींऽच संशय नाही! विचारसंक्रमणं होत आहेत; नवेनवे शोध होत आहेत; शास्त्रीयं जीवन वाढत आहे. आणि याचा ऽ...नाहीं म्हटलं तरी, मनुष्यावर अप्रत्यक्ष परिणाम खूऽपच होत आहे !...अशी उत्क्रांति खात्रीनें होत चालली आहे!—तेव्हां आतां ऽ शेवटचा छोटा पल्ला गांठायला केव्हांतरी क्रांतिसुद्धां खास होणारच! ...असं ऽ पहा ऽ, इतक्या ऽ लाटा उठत आहेत!...त्या कांहीं फुकऽट जाणार नाहींत अगदी ऽ खात्रीऽनें ! ...मनुष्याची आकलनशक्ती आतां वाढली आहे! संस्कारक्षमतेची वाढ ही काय लहाऽनसान गोष्ट आहेऽ,वेड्याऽ?...आम्हीं पस्तीशीच्या सुमाराला जें प्रयासानें शिकलों, तेंच आमचीं चार वर्षांचीं मुलं पूर्ण नैसर्गिक म्हणून धरून चालताहेत!... अगदीं जगाच्या सुरवातीपासून त्या गोष्टी चालू आहेत असं गृहीत धरूनच तीं पुढं चालूं लागतात! बोऽल आतां !!..."

—७—

जवळ जवळ बाविसावी ट्राम गेली, हें पाहून मी अस्वस्थ झालों होतों. पण गजाभाऊंच्या जिव्हाळ्याच्या एक एक वाक्यावरूनहि माझा कान हलत नव्हता.–

तोंच ते पुढं म्हणाले, " मनुष्याचा जीवनहेतु, त्याचं जगांतील समतेचं स्थान, औद्योगिक वाढीची दृष्टी, नव्या आशा, नव्या महत्वाकांक्षा,...यांच्या लाटांचे पडसाद अगदीं बालकांच्या मनावरहि झालेले आहेत!... आजचं दुपारचंच गमतीचं उदाहरण सांगतोंऽतुला! दिल्लीच्या हवेनें आतां माझे दोघे छोटे छोकरे पुन्हां चांगले झाले आहेत. आज दुपारीं मी युनियनचा कांहीं पत्रव्यवहार करीत घरीं बसलों होतों. तों दोघांचं भांडण ऐकलं! —"

आणखी एक ट्राम निघून गेली; तरी गजाभाऊ पुढं सांगतच होते— " माझा गरम तांबडा रुमाल विनूनें हातांत घेतला होता; आणि धाकट्यानें काँग्रेसचं निशाण असलेली माझी बाजारी पिशवी हात॰वर करून धरली होती. दोघेहि समोरासमोर 'लेफ्ट राइट' करीत आले आणि एकदम म्हणाल, 'इन्किलाऽब झिंदाऽऽबाद!'

"पण मग धाकटा म्हणाला, 'थोडे दिनमें गांधी राज!'–

" त्यावर गरम रुमाल वर करून हालवत मोठा म्हणतो– "नाय् नाय्... थोडे दिनमें मजदूर राज!–'

" तेव्हां धाकटा पुन्हां रागानें म्हणाला—'नाय् नाय्...थोडे दिनमें गांधी–राज!...'

"क्षणभरच विन्यानें त्याच्याकडे टवकारून पाहिलं व नंतर तो रागानें ओरडत म्हणाला, 'अरे॑जा॑रे !–मरोऽतुझा गांधीऽ !–थोडे दिनमें मजदूर राज! म्हण...म्हण आधींऽ...'

"—' अरे अरे ऽ !... भांडता ॑ हां काय ?–' असं मी म्हणालों खरं;... पण मग मला त्यांच्या त्या साऱ्या बालिश संभाषणाची व विशेषतः आवेशाची गंमतच वाटत होती! "

तेवढ्यांत, आणखी दोन ट्राम गेल्या होत्या. 'पण गजाभाऊंचाहि आवेश पुढें चालूच होता—

" आतां सां॑ग ?–या पोरट्यांऽच्या मनांऽत हे विचार कोणी रुजवले रेऽ? आम्हीऽ ?–आमच्या लहानपणीं तर आम्हांला टिळक–आगरकर तरी माहीत होते कां ?...आम्ही बरोबरीच्या मैत्रिणींत बुडकुल्यांनीं साखर-शंकरपाळ्यांची भातुकली खेळत होतों!...तें कांऽहीं नाहीं, बाबाऽ!...खूऽप॑खूऽप आशा आहे

आतां आम्हांला !...अरेऽ...पोरांपासून--थोरांपर्यंत साऱ्यांऽचीं मनंऽ आतां रेडियो झालीं आहेत, रेडियोऽ !—वाटेल त्या लहानमोठ्या लाटा त्यांत प्रतिध्वनी उठवतात;...त्यांना तुमची कृत्रिम एरियल आणि अऽर्थ लागत नाहींत !...हेऽच हेऽच ते नैसर्गिक रेडियो, बरंऽ!...रस्त्यांत...घरांत...सगळीकडे हे पसरलेले आहेत ! घरोघर नवे संदेश पोचतात ते असेऽच !... आतां यापुढला पल्लाऽ म्हणजे असल्या नुसत्या संस्कारक्षम 'रिसीव्हींग' स्टेशनांची वाढती संख्या नव्हे !...प्रत्यक्ष सामर्थ्यशाली लाटा सोडणारीं 'ब्रॉडकास्टींग' स्टेशनंच वाढलीं पाहिजेत !...हेंऽच तर पुढाऱ्यांऽचं, तुमच्या लेखणीऽबहाद्दरांचं साऱ्यांऽच एकमेव काम !...मग शेवटींऽअसा एक काळ येईल, कीं लाटा सोडणं व ग्रहण करणं, हीं दोन्हीं कामंऽएकच मानवी मनाचं न्यारं जिवंत यंत्र करील ! ते मात्र अगदीं अद्‌भुत रेडियो होतील बरंऽ!..."

— ८ —

गजाभाऊंच्या संगतींतील असले पूर्वीचे प्रसंग व विचार मी मनांत घोळत होतों, तोंपर्यंत ते माझ्या खोलींतून कितीतरी लांब निघूनहि गेले होते !...

मी दचकून भानावर आलों. बाहेर गजबजाट होता; तरी माझ्या घरीं मात्र शांतता होती ! रेडिओचं बटन मघाशीं खालीं केलं होतं तें तसंच होतं ! पण जणूं काय...गजाभाऊंनीं तें बटन खालीं करूनच माझ्या मनाचा हा नवा रेडियो सुरू केला होता.

खोलींत काळोख पसरला होता, त्याचं मला आतांपर्यंत भानहि नव्हतं ! मी उठलों व दिव्याचं बटन दाबलं ! पण मग माझ्या अंधाऱ्या खोलींत प्रकाश पडला, तेव्हांच मला गजाभाऊंचीं तीं दोन वाक्यं पुन्हां आठवलीं—"तुम्हां लोकांना आयतीं बटणं तेवढीं दावतां येतात ! पण नव्या ठिणग्या कांहीं पाडतां येत नाहींत !"

त्यावेळीं त्या आठवणीनेंहि मला अगदीं विजेचा धक्का बसल्यासारखं झालं... पुन्हां !

# ‘ मन चंगा ’ ★ १३

आमचा बाब्या नेहमीं म्हणतो—‘मन चंगा तो कठवटमें गंगा!—’ याचा अर्थ त्याचा त्यालाच ठाऊक!—

तसं म्हणाल तर त्याची वागणूक म्हणजे एक कोडंच आहे...पाळण्यांत वळवळणाऱ्या बाळापासून तों मान लटलटणाऱ्या लडबडणाऱ्या बुढ्या आदमीपर्यंत साऱ्यांशीं त्याची जानीदोस्ती!— तो आहे प्रेमळ; तरी पण प्रेमांत येऊन कधीं काय बोलेल, त्यामुळें त्याच्यावर कसला प्रसंग गुदरेल, एखाद्याशीं असलेल्या दाट मैत्रीचा डोलारा खाडकन् कसा जमीनदोस्त होईल, नि बाब्याच्या पदरीं मूर्खपणा नि कडवट वाईटपणा कसा नकळत येऊन पडेल, कांहींएक सांगतां यायचं नाहीं!—

हेंच पाहा—आबासाहेब.. वय वर्षं सुमारें पंचेचाळीस;..पण पंचविशीआंत-बाहेरच्या आमच्या बाब्याचे ते जिगरदोस्त!— लंगोटीमित्राप्रमाणें त्यांच्या खांद्यावर हात टाकून हा रस्त्यानें चालणार...दोघांनाहि एकमेकांवाचून क्षणभर देखील करमायचं नाहीं—

कोणाच्या घरच्या परिस्थितीची, गोतावळ्याची वित्तंबातमी कधीं काढायची नाहीं... खानेसुमारी करायची नाहीं,... हा त्याचा नियम! त्याच्या रक्तांतच नाहीं तें! अगदीं जरूर तेवढ्या प्रसंगीं, जरुर तेवढीच माहिती विचारायची, हा त्याचा मोठा दंडक! पण इतर हजारों विषयांवर कोणाशींही बोलण्याची त्याची नेहमीं तयारी!

स्वतः कांहीं कवि नाहीं तो! — उलट आमच्या माहितींतल्या कांहीं ‘ कवड्यां ’ च्या चोपड्या तर त्यानें ( त्यांच्या अगदीं प्रत्यक्ष काव्यगायनाच्या बैठकींतच ) आवेशानें धिःक्कार करून टरकावल्या आहेत! — स्वतः निरंकुश राहून नेहमींच्याच जीवनांत काव्य निर्माण करायचं, हाच एक त्याचा खाक्या!

— २ —

आबा—वाऱ्यांच्या दोस्तीचं तें कोडं !... त्याबद्दल त्याची प्रथम थट्टा नि मग एकदां कडक शद्बांत त्याची हजेरीहि घेतली मी.

तेव्हां एखाद्या तत्वेत्त्याचा आव आणून, त्यानें शेवटीं मला सुनावलं—" त्यांतलं तुम्हांला कांहीं कळायचंच नाहीं, लेकोऽ!— स्नेहाचं साम्राज्यच कांहीं और असतं !... आमच्या दोस्तीचं तुम्हांला आश्चर्य वाटतं !—पण कायरेऽ, प्रथमदर्शनी प्रेमाच्या गोष्टी तेवढ्या पटतात—कळतात तुम्हाला;— नाहीं ? एक मात्र लक्षांत ठेव;... माझी न् आबासाहेबांची जितकी दोस्ती आहे, तितकीच आमच्या नरुकाकांच्या छोट्या बगळ्याशीं आहे !—मी आमच्या शेजारच्या नलूच्या भातुकलींत जितक्या आनंदानें जेवायला बसतों, तितक्याच उत्साहानें तिच्या आजोबांबरोबर कालिकेपर्यंत फिरायला जातों संध्याकाळीं !—पण मग असल्या निर्भेळ स्नेहाची मौज तुम्हाला काय कळणार, म्हणा !..."

आणि मग डोळे मिचकावीतच, स्वारी मला पुढें म्हणाली—" तुम्ही आपलेऽबरोबरीच्या तरुणांचीं...( तसं कशाला...शक्य तर तरुणींचीच !... बेट्याऽनों )—ओळख काढाल ! हो ना ? हो ना ?—दे टाळी ! !—हूं, पुढं हां हां म्हणतां स्नेह ! आणि मग ?...थेट कादंबरीप्रमाणेंच एखाद्या !—टप्प्या-टप्प्यानें—' स्नेह ',...' सहवास ',...' प्रेम ',...' छोटा वसंत '... सारीं स्थित्यंतरं तुमच्याहि आयुष्यांत अनुक्रमानेंच यायचीं ! अरे लेकोंऽ ! दारावर अगदीं पाटीदेखील लटकावणार तुम्ही, कीं, ' इथं प्रेमविवाहित जोडपं राहतं' !—मग त्यापेक्षां तरी आमच्या बिचाऱ्या परकऱ्या शेंबड्या पोरींचं नि बोळकं झालेल्या बुढ्यांचं प्रेमच मला अधिक बरं वाटतं !—

पण पुन्हां हरदासी तट्टाप्रमाणें मूळपदावर वळून, मी त्याचे जानीदोस्त आबासाहेब यांची माहिती फिरून एकदां त्याला विचारली !...

त्यावर एकदम उसळून वाऱ्या म्हणाला, " म्हणजे काय ? दोघांच्या स्नेहाला माहितीची काय जरुरी ? मूर्खा !—जिवंत माणसाचा स्नेह मिळवणं न् त्यांच्या मनाचा मोठेपणा जाणणं, हें कांहीं न्यारंच असतं ! त्यासाठीं...ऐतिहासिक मृत पुरुषांसारखं कोणाच्या जन्माचं न् सनावळींचंच संशोधन करावं लागत नाहीं कांहीं,... "

०८६९

थोडा वेळ गप्प राहून विचार केल्यावर, वाश्या आपल्या समर्थनार्थ पुढं स्पष्टीकरण करता झाला, "असं बघ, आम्ही त्यांना कधीं सिगारेटचा तुकडा मोडून दिला तर ते तो ओढतात; त्यांनीं आपल्या खिशांतल्या आरशाच्या जुनाट पेटींतून पिवळ्या धाग्याची 'फर्मास' दिली कधीं, तर आम्हीहि मोठ्या आवडीनें ती ओढतो!—मग आतां सांगा गाढवांऽनो, तरीही आम्ही त्यांच्या घरांतील बायका-पुरुष-मुलं यांचं काळकामवेगीं व्यस्त-सम त्रैराशिकच मांडलं पाहिजे?...त्यांचे ते पूर्ण मुखत्यार आहेत कीं...त्या बाबतींत!!—दुसऱ्यांच्या उठाठेवी आम्हाला कशाला?..."

'तेंऽकबूल!" मी त्यावेळीं त्याला समजावलं होतं; "पण लेकाऽ, समाजांत रहायचं, तर...ओघानें येणाऱ्या या साऱ्या विविध बंधनांना अगदींच झुगारून चालत नाहीं!—क्षुल्लक गोष्टी देखील..."

"बस्स, बस्स! पुरेऽ तुझं पांडित्य!..." वाश्यानें लागलीच हुमकरेसो कायदा केला!—

— ३ —

आतांपर्यंत त्याच्या बेफाट सैल जिभेचा त्याचा त्यालाच चाबकासारखा अनपेक्षितपणें तडाखा बसल्याचे अनेक जुने दाखले माझ्यापाशीं होते...... या वेळींहि मला ती दुष्ट आशा होती!—म्हणूनच त्यावर मी मौन स्वीकारलं!

आणि शेवटीं, एके दिवशीं झालंहि तसंच;– वाश्या अगदीं आंबट चेहरा करून माझ्याकडे आला!—

असा आंबट चेहरा झाला, कीं तो प्रथम माझ्याकडे प्रामाणिकपणें येत असे; त्या वेळीं मीहि अगदीं गप्प बसे.

अखेर मग, तोच आपण होऊन सारं सांगे!—

आज त्यानें तसंच केलं "तूं म्हणतोस तेंच खरं, दोऽस्त!...कधीं कधीं चुकतंऽबुवा आमचंऽ!" वाश्याचा पश्चात्तप्त जीव मळमळणाऱ्या भावना ओकत होता– "आज प्रथमच आबासाहेबांच्या घरीं गेलों मी!—आणि काय? ...शेवटीं आबासाहेबांनीं आम्हाला एकदम घरांतून बाहेर काढलं!!—"

वाश्याचा चेहरा गंभीर झाला होता!—विस्कटलेले केस कपाळावर येऊन

त्याच्या चेहऱ्यावरहि रडवेपणाचा दाट भाव दिसत होता. तरी पण शक्य तितकं हास्य आणून, मोठ्या खेळकर मनमोकळेपणें तो मला सारं सांगूं लागला—

— ४ —

"बरं का? आबा आज प्रथमच मला म्हणाले " चला दोऽस्त, आमच्या घरीं!—बरेच दिवस ही घरांत सांगतेय्, तुम्हांला घरीं आणा म्हणून!"—" मीहि पटकन म्हणालों, " मग चलाऽकीं..." अरेऽ, जुन्या नाशकांतल्या— संडास दारांत असलेल्या...अठराशें सत्तावन सालच्या—एका बोळांतल्या घरांत रहातात ते, दुसऱ्या मजल्यावर! आंत शिरतांच त्यांचा दिवाणखाना लागला; तो सारा रविवर्म्यानें विभूषित केला होता!—नळ—विरहानें तळमळणारी दमयंती,... वस्त्रहरण केलेल्या गोपी (आणि अर्थातच जवळपास बांसरीमोहन कृष्ण)... डोक्यावर हात घेतलेला विश्वामित्र अन् छोट्या शकुंतलेला हातांत घेतलेली बापडी मेनका,...अनेक राण्यांच्या गराड्यांत अंघोळीला बसलेला... तुंदिलतनु उघडाबंब गोपीचंद राजा—

साऱ्यांचं तिथं संमेलन भरलं होतं!—त्यांत मीच काय तो विसाव्या शतकांतला नवमतवादी ब्रम्हचारी तरुण!—

तोंच घरांत गेलेले आबासाहेब फराळचं घेऊन पुन्हां बाहेर आले; त्यांच्या-कडे पाहून मी सहज बोललो " कितीं भानगडी माणसं तुम्ही आपल्या दिवाण-खान्यांत जमवून ठेवलीं आहेत होऽ, आबाऽ? आमच्या तरुणांचं एक सोडा— पण...तुमच्यांतलाही हिरवटपणा अजून—"

त्यावर किंचित तिरसटपणेंच हंसून व अस्पष्ट हुंकार देऊन, आबा पुन्हां लगबगीनें आंत गेले!—

वाटलं—' रस्त्यांत नेहमीं माझ्याशीं तरण्या मनानें अघळपघळ गप्पा मार-णारा हा गृहस्थ!—घरांत मात्र असा अगदीं घुम्या कां आज?'—

— ५ —

शेवटीं, माझ्या भोंवतालचे देव, ऋषी-महर्षी नि आंत लगबगीनें शिरलेले आबासाहेब यांना त्यांच्याच भानगडींत सोडून, आमच्या यजमानांच्या मानवी घराचा, बसल्या बसल्या, मी जीवाच्या कानानें कानोसा घेतला!

आंत खूप दंगा चालला होता पोरांचा; लहान-मोठीं निदान अर्धा डझन... पांच सात तरी असावींत ! एक प्रौढ बाई-बहुतेक आबासाहेबांची बायकोच-कांहींतरी त्रागयानें आदळ-आपट करीत चुलीजवळून तणतणत होती; आणि आबासाहेब ? एकीकडे मुलांना दटावून, तिला कांहीं तरी समजूतदारपणें-अजीजीनें सांगत होते.

भोवतालच्या चित्रांप्रमाणें, त्या फराळाच्या ताटाकडे एकटंच आशाळभूत-पणें पहात गप्प बसणं मला बरं वाटेना !—शेवटीं, मी जागचं उठून आबांच्या दिवाणखान्यांत सहज एक चक्कर मारली.

एका कोपऱ्यांत चार दोन समाजस्वास्थ्याचे अंक; त्यावरच हरिविजय, शिवलीलामृत; शेजारीं किर्लोस्कर; दुसऱ्या कोपऱ्यांत अंकलिपीपासून तों गोखले नायकांच्या अंकगणितापर्यंत अस्ताव्यस्त पडलेलीं पोरांची खूपशीं पुस्तकं;... तिसऱ्या कोपऱ्यांत अर्धवट पसरलेल्या मोरपिसाऱ्यांचं वर्तुळ सुईसह पडलेलं;... जवळच, दुमडून ठेवलेली नव्याजुन्या कपड्यांची टिपा मारावयास घेतलेली गोधडी...

तोंच,... चून पसरलेल्या बटाटे-पोह्यांच्या दोन बश्या घेऊन आबासाहेब आंत शिरले; मला तसं एकटंच फिरतांना पाहून, ते मला सस्मित म्हणाले, "कां होऽ? वासुदेवराऽव ? कराऽकीं सुरवात !"

त्यांचे ते अनेकवचनी शब्द एकदम कानीं पडतांच दचकून 'हो हो !' म्हणत मी जाजमावर जाऊन बसलों !—

आबासाहेबांनीं मोठ्या आस्थेनें चार पांच प्रकार केले होते ! काय त्या प्रेमळ माणसाचा माणूसलोभीपणा !—पण काय असेल तें असो; सारखी आज चुळबुळ चुळबुळ चालली होती त्यांची ! बोलतही होते जेवढ्यास तेवढं !—कां ?

तसा आबासाहेबांना मी कांहीं प्रश्न विचारण्यापूर्वीच ते पुन्हां पटकन उठले नी आंत गेले !—

— ६ —

दोन कप घेऊन आबा परतले तेव्हांचा त्यांचा संकोची गोंधळी चेहरा मला अगदीं असह्यच झाला !— मी त्यांच्याकडे पाहून बळंच हंसलों, आणि केवळ थट्टा करण्यासाठीं डोळे किलकिले करून म्हणालों, " काहोऽआबासाहेब, इतका गोंधळ काय चालला आहे आज?...जसं कांहीं आपल्या मुलीचं लग्नऽच ठरल्यासारखं काय करतांहा अगदीं !—बसाऽना इथं थोडं..."

आणि काय आश्चर्य !—गृहस्थाच्या उजव्या हातांतील कप धाडकन् खालच्या मळक्या फाटक्या जाजमावर पडला !—चहा सांडला न् त्यांच्या मुलीचं सोडा-पण त्या कपबशीचं मात्र लग्न लागलं तत्काळ तिथल्या तिथं !—

मग त्यांचे डोळे तर इंगळासारखे लाल झाले; ओंठ थरथरू लागले. आणि मग दुसरा कप खालीं ठेवून, अडखळत अडखळत माझ्यावर आबा अनपेक्षितपणें ओरडले, " चूप !–एकदम चूऽप !—कमाल तुमच्या निर्लज्जपणाची !—लाज नाहीं वाटत, दुसऱ्याच्या जखमेवर असा घाव घालायला ?—"

माझं क्षणभर सुन्न झालेलं डोकं ताळ्यावर येण्यापूर्वीच ते पुढेंही कडाडले— " चोरून ऐकलेच असतील म्हणा तुम्हीं माझ्या बायकोचे मिनटापूर्वीचे घरांतले शद्ध !—हो...हो,...माझ्या मुलीचं आज सहा वर्षं लग्न जमत नाहीं कुठं !—नि बायकोच्या आग्रहानेंच तुम्हांला मी असं घरीं बोलावलं आहे आज!... तरी कांहीं तुमच्या इच्छेविरुद्ध तुमच्या गळ्यांत घोरपड तर नव्हतोंऽना बांधणार ?... मींहि एक सभ्य माणूस आहे !...

आबासाहेब सूर चढवत चढवत शेवटीं थांबले !—माझ्या तोंडाला भीतीनें कुलुपच बसलं होतं !—

— ७ —

तोंच आबासाहेब पुढं म्हणाले, " मी स्वतःच सारं तुमच्यापुढें आणून ठेवीत आहे फराळाचं, म्हणून ती तिकडे घरांत मला मघांपासून फाडफाडून खातेय !—आणि बाहेर तुम्हीं हे असे हंसत हंसत टोमणे मारतांहां ! मी विनडोक नाहीं !—मला समजतंय् सारं ! पण सभ्यपणाच्या कांहीं मर्यादा तरी पाळाल कीं नाहीं, समाजांत वागतांना ?— गरीब, नडलेला, एक मुलीचा बाप असलों, तरी स्नेहाचा पाहुणचार कळतो, मला ! चार मुलाबाळांचं सभ्य गृहस्थाचं घर आहे हें ! तोंड आवरून बोला !– समजलांत ?— "

त्या सगळ्याच अनपेक्षित प्रकाराविषयींचं माझं आश्चर्य ओसरण्यापूर्वीच मी बोलण्याचा प्रयत्न केला !–पण काय बोलावं तेंच समजेना !–दुर्दैव असं कीं आबांची ती लग्नाची मुलगी काळी कीं गोरी तीहि मी जन्मांत पाहिली नव्हती.

शेवटीं मोठ्या प्रयासानें, रदबदली करावी या हेतूनें, आबासाहेबांची माफी

मागण्यासाठीं मी अगदीं अजीजीनें म्हणालों, " हें पहाऽआबासाहेऽब !— तुमचा गैरस... "

" बस्स, पुरे ऽ ! आतां कृपा कराल कां ?— " ते पुन्हां तिरमिरीनें म्हणाले... " तुमची मानभावी मैत्री नकोय् मला !– "

आणि तेथून आमची दोघांची भाषा संपली !— मी आपल्या पायानें निमूटपणें कसाबसा आबांच्या घराबाहेर पडलों !–

— ८ —

कपाळावर हात घेऊन, वाश्या खालीं पहात बसला !

त्याचा चेहरा रडवा पाहून, मला हसावं कीं रडावं कांहीं कळेना !—त्याच अखेर सांत्वन करण्यासाठीं मी म्हणालों, " अरे वाश्या ऽ— गाढवाऽ !— तुला धोरणच—"

" चूऽप !— आतां तूंहि कांहीं बोलूं नकोस !—" वाश्या माझ्याकडे चवताळून वळला; व आबासाहेबांच्याच आवेशानें माझ्यावर ओरडून म्हणाला, " गाढवपणा आंकडेमोडीनें सिद्ध करण्याइतका जगांतल्या शहाणपणाचा कांहीं मक्ता घेतलेला नाही आहेस तूं !—समजलाऽस ?... अजूनही मी तेवढ्याच जोरानें तुला सांगतों...स्नेहाचं खरं साम्राज्य कधींच नाहीं कळायचं तुला !... अरे ' मन चंगा तो कठवटमे गंगा ! "

———

# तो—ओऽ शाळा !.. ✶ १४

आजच्या चर्चेंत सारीं अगदीं रंगून जागं साहजिकच होतं. ' नाट्यच्छटा-कार दिवाकरां ' च्या ' दिनकरपंत कारकुना ' च्या दुःखी वैराण आयुष्यानें आमच्या सर्वांच्याच हृदयांचा तसा पगडा घेतला होता...

तेवढ्यांत घंटा झाली, म्हणून मी उठलों; पुस्तक बंद केलं; पण वर्गातून बाहेर पडतां पडतां, समोर बसलेल्या त्या मॅट्रिकच्या मुलांना शहाणपणा शिकव-णारं, शेवटचं एक धावतं वाक्य उच्चारलंच—" तेव्हां एकंदरींत काय...कीं,... या नाटिकेंतल्या घटना आपल्याला जरा भडक वाटल्या,...तरी त्यांना वास्तवाच्या पायाचा अगदीं भरपूर आधार आहे !...न्यूनगंडानें पछाडलेल्या कारकुनी मनाचं,... त्याच्या सर्व टप्प्यांचं अगदीं उत्तम चित्रण आहे हें !—पण मग,... हेंही लक्षांत येतं आपल्या, कीं, समाज नि परिस्थितीच, शेवटीं...माणसाचं बरं-वाईट मन तयार करतात !—"

त्या चाळीस मिनिटांच्या वडबडीनें माझा घसा तर चांगलाच कोरडला होता; पण पुढला तास मोकळा असल्याची जाणिव होऊन मात्र जिना उतरतां उतरतां मला जरा हायसं वाटलं.

...नि म्हणूनच , थोड्या निश्चित नि अनिर्बंध मनानें संथ पावलं टाकत, मी आमच्या खोलीकडे वळलों...

— २ —

दारांतून मी आंत शिरणार, तोंच, बऱ्याच दिवसांनीं तो मला मध्येंच घुटमळत उभा असलेला दिसला !...

त्याच्या पोशाखांत फारसा फरक दिसत नव्हता; मळका लेंगा जाऊन काचा मारलेलं शुभ्र धोतर; काळवंडलेलीं पत्र्याचीं बटनं जाऊन, रुप्याचीं बटनं लावलेला उभ्या रेघट्यांचा शर्ट; पूर्वीं इथं असतांना दिसत नसे, तरी आतां नवा पण साधाच मद्रास टस्सरचा कोट अंगावर !

प्रकृतींत मात्र चांगली सुधारणा झाली होती. पांच वर्षांत वयाचीही वाढ होऊन, आतां अठ्ठाविशीकडे झुकणारा काळासांवळा पण चांगला ठाकठीक जवान झाला होता तो!... आणि दुसरं म्हणजे अडीचआणे-प्लेट ऐवजीं, हल्लीं तो चांगलं भरपूर नि अधिक सकस खात असावा, असं त्याचे आतां थोडे वर आलेले ( पण पूर्वीचे चपटे ) गाल, मला स्पष्टपणें सांगत होते. पूर्वीचा त्याच्या डोळ्यांतला ओढेलपणा जाऊन, ते अधिक खेळकर नि समाधानी झाले होते, हें तर नक्कीच.

इतक्यांत, मला पहातांच त्यानें आपले स्वच्छ दांतही मला, दाखवले; नि पुढं येत तो हसून प्रेमानेंच म्हणाला—" काय सऽऽ र? संपला ऽ वर्ग?"

" या ऽ गणपतराऽव!...आज इकडऽकुठं वाट चुकलांत तुम्हीं?" मी पण हसून त्याच्या पाटीवर हळूंच थाप मारून म्हटलं.

तो एखाद्या तरुण मुलीसारखा एकदम लाजला; नि माझ्या बरोबरच चालतां चालतां म्हणाला—" अशी चेष्टा नका नाऽकरूं, सर, माझीऽ!...तुम्हा-लाऽच भेटायला आलोंय्; तुमचीऽच वाटत पहात होतों...इतका वेळ!..."

" अरे, मग इतके दिवस या शाळेंत घालवलेस!...तुला काय मॅट्रिकचा ' ए ' वर्ग ठाऊक नव्हता ?–थेट तिथं यायचं होतंस!..." मी हंसून हातांतलं पुस्तक आंत ठेवण्यासाठीं खण उघडला.

" कशाला ?—तशी घाई नव्हती कांहीं मला! नि...पूर्वीच्या संवयीप्रमाणें टाइम–टेबलांत जाऊन पाहिलं मी, तुम्हांला हा ,पुढला ऑफ असल्याचं!—" त्यानें पुन्हां स्मित करून म्हटलं...

" मग वेड्याऽ बसायचं तरी होतंस, शांतपणें!—" खण बंद करून मी त्याच्याकडे वळलो.

त्याचा चेहरा खर्कन् थोडा पालटलेला दिसला मला;... कां? मी किंचित् गोंधळलोंही त्यामुळें!—

— ३ —

पण मग भोंवतीं पाहिलं;... तीन चार सहाध्यापक होते खोलींत;... एक वर्तमानपत्र वाचत होते; एक वह्या तपासत होते; दोघे हळूं हळूं गप्पा मारीत राजकारणाचा अव्यापारेषुव्यापार करीत होते.

मी जरा कौतुकी स्वरांत अभावित अभिमानानें त्यांना म्हणालों..." अहोऽ

ऽ...पाहिलंत कां ?...गणपत आलाय् आपला, आज !—"

" होऽ पाहिलाऽ ना !—भेटला मघां आम्हाला ..." दोघातिघांचे निर-निराळे आवाज आले —नि मग प्रत्येक जण आपापल्या कामांत पुन्हां गढला !

तो माझ्याकडे पहात होता; मीं त्याच्याकडे चोरट्या नजरेनें ओझरतं एकदां पाहिलं; नि पटकन् त्याची दृष्टी चुकावयला मान बाजूला वळवली !

मग मी मधल्या टेबलाजवळच्या एका मोकळ्या बांकावर जाऊन बसलों. पाय टेबलावर टाकले नि मागं रेललों.

" आणखी काय, सर ?... दसऱ्याला सोनं द्यायला तुमच्या घरीं आलों; त्यानंतर अगदीं आजपर्यंत वेळच मिळाला नाहीं बघा भेटायला !"—त्यानेंच विषय पालटून बोलायला सुरवात केली.

... त्याच्या त्या प्रत्येक शब्दांत,... हालचालींत,... त्याच्या मनांतला उत्साहआनंदच तरंगत होता; माझ्याबद्दलची अहेतुक स्नेहाळ वृत्ती प्रत्यक्ष प्रति-बिंबित होत होती !—

" तूंऽ काय बाबाऽ, आता फार कामाऽचा माणूस झालास, गणपऽत ! " क्षणभरानें सिगारेटची पेटी खिशांतून काढत मी हंसून म्हणालों...

" खरंऽच तें !– फारऽ काम पडतं हल्लीं, सर ! मग येणार तरी केव्हां सांगा ? मागं एकदां भाषांतराला पेपरांत घातली होतीत ना कविता ?-तस्संऽच !... 'नो टाइम टु स्टँड अँड स्टेअर' ! —रविवारीं सुद्धां ओव्हरटाइमला बोला-वतात आमचे हेडक्लार्क ! मऽग " तो मोकळ्या मनानें म्हणाला.

" अस्सं ऽ ऽ ?— पण मग ओव्हरटाइमचेहि आणखी जादा पैसे मिळवीत असशील! बँकेतबिंकेत ठेवतोस कीं नाहीं ?...मला तरी व्याजीं दे थोडे ! हल्लीं आमची फार टंचाई झालीय् रेऽ अगदीं " मी जरा थट्टेनेंच त्याला म्हणालो.

"हो हो !—जमले कीं देईन कीं !—पण सर, बँकेत ठेवण्याइतका नि तुम्हाला व्याजीं देण्याइतका जास्त नाहीं झालेला पैसा माझ्याकडे अजून !— तो पुन्हां किंचित् लाजला; नि तोंडभर हंसला... " बाकी एरवी ठीक चाललंय् ! सध्या नव्वद नि महागाई तीस मिळते !—"

तेवढ्यांत मी एक सिग्रेट काढून तोंडांत धरली नि पेटी त्याच्यापुढें केली

" हेंऽ काय ? चेष्टाऽकाय करताय सर माझी आज एकसारखी !... ' तो मोठ्यानें दचकून नि पुन्हां खूप लाजून नकारार्थक मान हलवीत म्हणाला.

" झालंऽ !—तुला ऑफर केली तर चेष्टा झाली !... नि सिग्रेट ओढायलाही अजून शिकला नाहींस कां ?... मग रेऽ तुला कसला खर्च आलाय् ?... करतोऽस तरी काय पैशाचं ? अंऽ " मी धूर सोडून हंसत म्हणालों.

पण माझ्या पटकन् लक्षांत आलं;... अजून गणपत माझ्यासमोर बांकाला ओडगून उभाच आहे. हाताचीं कोपरं टेबलावर टेकून वांकल्या वांकल्याच माझ्याशीं तो इतका वेळ हळूहळू बोलत होता.

त्याचा चेहरा पुन्हां पालटला. लाजत लाजत सभोंवार पाहून पण निश्चयानेंच तो म्हणाला— " छेऽ ! कांहीं नको !...हें असं उभ्यानेंऽच बरं बोलायला तुमच्याशीं, सर ! "

तेव्हां मी जरा पटकन बाजूला सरलों नि किंचित् अपराधी मनानेंच त्याला म्हणालों... " अरेऽ ? तूं उभाऽरे कां, गणपत ?...बऽस ना इथं असा !—"

तो तिथं बसायलाच लाजत होता; माझ्या पटकन् लक्षांत आलं तें ! आणि त्याच वेळीं, आज त्याला तसं माझ्यासमोर उभं राहून कुजबुजत बोलतांना पाहून, पांच वर्षांपूर्वीचा तो प्रसंग चमकन् माझ्या डोळ्यापुढून चमकला...

— ४ —

त्यावेळींहि तो असाच माझ्यासमोर हात दुमडून टेबलाजवळ वांकून उभा राहिला होता. नि अगदीं कुजबुजत रुद्ध कंठानें मला म्हणाला होता—" सऽर, जमणार नसलं तुम्हाला, तर आपलं लागलीच विसरून जा !—पऽण विनन्ति आहे तुमच्याकडे एक माझी ! "

" कसलीऽरेऽ ? " मी चमकून विचारलं...

" मलाऽफॉर्म भरायला पंधरा रुपये देतांऽआज? उद्यांऽची शेवटची तारीख आहे !— जमेल तितक्या लौकर परत करीन ! "

तें ऐकतां ऐकतां, माझ्या खिशाचा मी मनांतल्या मनांत किंचित अंदाज घेतला होता; नि मग मी त्याला ते लागलीच त्याच बैठकींत कांहीं न बोलतां काढून दिले होते. किती आनंदला होता चेहरा त्याचा !.

पुढें तें सारं विसरलों होतों मी ! पण त्यानें मात्र आठवण ठेऊन, अगदीं रिझल्टपूर्वीच, मला मुद्दाम घरीं येऊन ते आणून दिले होते !—

मग दोन महिन्यांनीं त्याचा रिझल्ट लागला होता. तो पासहि झाला होता. ती त्याच्या आयुष्यांतील क्रांति होती. त्यामुळेंच तो आमच्या या वातावरणांतून

पंख फुटलेल्या पांखरासारखा एकदम दूर उडून गेला होता.

त्यानंतर मध्यें कधीं नाही तरी दर संक्रांतीला तिळगुळ नि दर दसऱ्याला सोनं द्यायला, हटकून, अगदीं न विसरतां,... तो माझ्याकडे येत आला होता घरीं;... अगदीं मोकळ्या मनानें हसून-बसून तो तासभर माझ्याकडे घालवायचाच त्यावेळीं! कां कोण जाणें, माझं गरिबाऊ घर त्याला आपल्या घरच्यासारखं वाटे—

जन्मजात ब्राह्मणेतरांच्या शिक्क्यामुळें अगदीं सुरवातीलाच तो साठ रुपये मिळवूं लागला होता. मग आणखी लढाई सुरूं झाली. तिनें तर त्याच्या आयुष्यांत अधिकच चमत्कार घडवून आणले. सुरवातीला ए. आर. पी., मग रेशनिंग नि आतां तर तो पोर्टट्रस्टमध्यें उडी मारून तिथेंहि कायम झाला होता. अगदीं जवळ जवळ आमच्याइतकंच मिळवूं लागला होता.

माझ्या गैरहिशेबी संसारामध्यें,... कुठे तरी पडले असते किंवा कसे तरी उडाले असते,...असले माझे केवळ पंधरा रुपडे, फक्त दोन महिन्यापुरतेंच वापरूनही, तो प्रत्येक भेटींत, आपल्या बढतीची बातमी आनंदानें मला सांगून झाल्यावर म्हणे—" सर, मॅट्रिकची नि ही पुढली सगळी किंमत,...तुमच्यामुळेंच आली मला !...नाही तर पंधरा रुपये गोळा होईपर्यंत, ते गोळा करत करतच,... मी म्हातारा झालों असतों !"

मिनिटभरांतच हे सारे प्रसंग माझ्या डोळ्यांपुढून भराभून गेले.

— ५ —

त्या विचारांतून पुन्हां भानावर आलों, तेव्हां गणपत माझ्याकडे व खालीं आलटून पालटून पहात तसाच मुग्ध उभा आहे नि भोवतीं अगदीं शांतता आहे,याची जाणीव झाली मला !—

मी त्याच्याकडे पाहून मुकाट्यानें हंसलों. तोहि हंसला.

ती शांतता खूप बोलकी होती. तेवढ्या मिनिटांतच त्याच्याहि मनांत पुष्कळ येऊन गेलं असेल.

मग मीच पुन्हां सुरवात केली..." हंऽ...तेव्हांऽअसंऽआहे म्हणतोस !—टीऽक ! बरं पण, आऽज कां आला होतास ?...सहऽजच ना ?..."

" तसंऽम्हटलं तर सहज;...नाही तर मोऽठ्या कामानिमित्त..." तो थोडं हंसून—लाजून म्हणाला.

" म्हणजेऽ ?—ऑफिस नाही तुला आज ?" मी आश्चर्य व्यक्त केलं. " ...नि राहतोस कुठं ?—आहेऽकाय भानगड ??"

" भानगड नाहीं कसली !..." तो मोठ्यानें हंसला. " आजपासूनच आठ दिवस रजा घेतलीय् !...जागेची हल्लीं पंचाईत ना...रहातों पारल्याला; मिळालिय् साधारणशी जागा !—"

" अस्सं ऽ...नि जेऽवायला ?... " मी चौकसलं ...

" माझ्या आईला आणलीय ना कोकणांतून ! " तो अभिमानानें चेहरा फुलवीत म्हणाला—

" अरे, खरंच !...हं, आईला आणलीस तें ठीक झालं !पऽण... " मी मिस्कीलपणें हंसून म्हणालों... " आतां बायकोला केव्हां आणणार आहेस ?... कोकणांतून आण,... नाहीं तर कुठूनही आण ?...पण आतां आण !—"

" तेंऽच ना, सर !..." तो पुन्हां खूपच लाजला—" तेंच तर सांगायला आलोंय् ;...लग्नासाठींऽच रजा घेतलीय् ही ! परवां संध्याकाळीं, गुरवारीं आहे;... किर्ते भंडारी हॉलमध्यें !...जरूऽर या हं ! –गडबडींत घरीं यायला जमायचं नाहीं मला; म्हणून इथं आलों मुद्दाम,... शाळेंत !—"

" ओ ऽ हो ! अभिनंदन ...अभिनंदन !—" मी त्याचा हात हातांत धरून हलवला; तेव्हांही तो खूप लाजला.

मग अगदीं कुजबुजतच मी विचारलं..." कुठली रेऽमुलगी ?..."

" कसलींऽसर , आमचीं गरिबांचीं हीं लग्नं ?...आमच्यासारखेच ते लोक !" ...तो सस्मित म्हणाला ..." पण समाधान इतकंच, कीं, ती दिसायला नीटस आहे ! नि कोकणांत राहूनही पांच यत्ता शिकलीय् मराठी !—"

" वाः वा: !...छान !—मग तूं शिकवशील कीं तिला, तुझ्या नाइट-स्कुलांत,...पुढं !"...मी केवळ गंमत म्हणून तसला सामान्य शब्दछल केला. " नाहीं तरी तूं स्वत: नाइटस्कुलांत शिकूनच मॅट्रिक झालास ना ? "

तो मोठ्यानें हंसला; त्याच्याबरोबरच मीहि पुन्हां हंसलों.

— ६ —

पण हंसतां हंसतां एकदम गंभीर होऊन तो माझ्याकडे पहात म्हणाला—" खरंऽच, सर !—वर्गांची झाडलोट करत नि दिवसभर नोटिसा फिरवीत वर-खालीं फिरत, मी या आपल्या शाळेंतील शिपाईगिरी करत होतों,...तेव्हां पांच वर्षांपूर्वी, मला इतके बरे दिवस येतील असं स्वप्नही नव्हतं पडलं ! मला नाईटस्कूलनें नि तुमच्यासारख्यांच्या आशिर्वादांनीच तारलं !—गोखल्यांचे

रास्ते नाहीं, तरी गणपत शिपायाचा निदान कारकून तरी झालों ! तेवढंच आपलं कर्ज फिटलं;... नि आतां हा संसार होतोय् !—पुढें काय होईल तें पहायचं... ”

“ अरे, पुढंऽकाय होणार, वेड्याऽ ? सगळंऽ चांगलंऽच ! डरना मत !!...” मी हंसून त्याला उत्तेजिलं.

“ बरं,...आतां बस बघूं इथं !... चहा देऽतोस की घेतोस ? बोल ? बस ना !—” क्षणभरानें मी आपुलकीनें त्याला पुन्हां आग्रहानें म्हणालो.

तो पुन्हा एकदम चमकला भोंवतीं पाहून—नि

“ नकोऽसर !—” संकोची स्वरांत हळूंच...

“ कांऽरेऽ?...” मी जरा गोंधळलों.

“ तें तुमच्या घरचंऽ निराळं !...’ तो घुटमळत अस्पष्ट म्हणाला,... “पण या शाळेंत तरी तुमच्या नि साऱ्यांच्या जवळ बसणं जिवावर येतंय् !...तुम्हीं नाहीं...पण दुसरे काय म्हणतील ?—चार वर्षं पंधरा रुपड्यांचा शिपाई होतों ना, सर, इथला मी !—”

इतक्यांत... घंटेचा टोला पडला; तो म्हणत होता तें सत्य होतं !...

— ७ —

अगदीं सोडवणूक झाल्याच्या चेहऱ्यानें गणपत हंसून म्हणाला... “ पाहिलंऽत, सर !—घंटाहि झाली, तुम्हाला वर्ग आतां आहे;...मी पण जातों !—उशीर झाला !—चलाऽ !—”

तो लगबगीनें जायला दाराकडे वळला; पण मग किंचित् थबकून मागं वळत म्हणाला—“ पण लग्नाला याऽहंऽ, सर, परवां !...जरूऽर ! !—”

“ हो...होऽ !—” मी प्रेमानें—कौतुकानें हंसून म्हणालों. “ त्यावेळीं हा आजचा राहिलेला चहा दे हंऽ मात्र ! ”

तो हंसत हंसत दूर निघून गेला; तरी त्याचा तो गोंधळलेला चेहरा मात्र माझ्यापुढें दिसत होता सारखा, किती तरी वेळ !—

आणि मग पुन्हां सातवीच्या वर्गावर जातां जातां, मला एकच एक विचार सारखा भंडावीत होता...“ सगळंऽखरं ! पण तो बसलाऽनाहीं !—हंऽकाय माण-साचं मन असतं पहा !—”

———

आम्ही दोघे समोरासमोर तसे बराच वेळ अबोलपणें बसलों होतों; तोंच काळोख दाटला; केवळ त्यांना भानावर आणण्यासाठींच मी पटकन् उठलों नि डोक्यावरचं बटन दाबलं.

दुकानांत चकन् उजेड पडतांच ते चमकले, उठले; नि पूर्व-संस्कारस्फूर्ती-प्रमाणें त्यांनीं दिव्यासमोर यांत्रिकपणें हात जोडले.

मघांपासून गादीसमोर पैशाच्या पेटीवर पळसाच्या पानांची एक पुडी पडली होती; आंतला हार काढून त्यांनीं समोरच्या भिंतीवरील दत्ताला घातला; लहानशा तबकांत चार कापराच्या वड्या पेटवून त्या ओवाळल्या; नि पेटीवर आरती ठेऊन, हवेंत विरणाऱ्या कापराच्या धुरावर हात ओवाळून, तळवे एक दोनदां आपल्या चेहऱ्या-कपाळावरून फिरवले; तीन उदबत्त्या पेटवून तज-विरीखालच्या भिंतीच्या फटींत रोंवल्या; नि पेढ्यांची पुडी सोडून तींतले दोन दत्तासमोर ठेवल्यावर ते पुन्हां गादीवर येऊन बसले.

तबकातला कापूर जळून गेला होता; उदबत्त्यांचा सुगंध मात्र अजून चौफेर दरवळत होता.

रस्त्यावर ट्राम-मोटारी नि माणसं वर्दळत-गजबजत होतीं; दुकानांत मात्र किती तरी वेळ अगदीं शांत होतं...

तेवढ्यांत, त्यांनीं पुडींतले माव्याचे पांच पेढे सुहास्यमुद्रेनें माझ्या हातांत ठेवले; ते खाऊन संपत आहेत नाहींत, तोंच, त्यांच्या पोऱ्यानें, बर्फ तरंगणाऱ्या डाळिंब-सरबताचा ग्लास माझ्या हातीं दिला.

मग गादीजवळच्या एका उघड्या शिसवी पेटींत रांगेनें लावून ठेवलेल्या अत्तरांच्या रंगीबेरंगी लहानमोठ्या कुप्यांपैकीं एक हिरवी शिसी त्यांनीं काढली; हिन्याचा बोळा करून मोठ्या आदबीनें माझ्या मनगटाजवळ चोळला; नि शेवटीं, हिरकुटासह तो माझ्याच हातीं देऊन ते लोडाला टेकले.

मग पुडींतला एक पेढा आपल्या तोंडांत टाकून सस्मित चेहऱ्यानें ते मला म्हणाले--" हां ! अभि कुछ् कहिये, महाशय ! "

卐

जवळजवळ गेले तीन महिने, अगदीं दर गुरुवारीं, याच दुकानांत, याच संध्याकाळच्या वेळीं, सर्व अगदीं हें असंच होत असल्याचं,... मी पहात आलों होतों...

मी कोणी त्यांच्या धंद्यांतला झोपाळू भागीदार नव्हतों—कीं विक्री—खरेदी नि जमाखर्च यांचा हिशेब पहायला, मी त्यांच्याकडे दर आठवड्याला तसं जावं. त्यांच्या बाटल्या खपवणारा एकादा एजंटहि नव्हतों त्यांचा मी !...नि स्वतः अत्तरं विकत घेऊन अंगाला चोपडण्याचा वेडा नाद तर जन्मांत कधीं टाऊक नाहीं मला !...

प्रत्येक गुरुवारीं मी तसा त्यांच्या दुकानीं जायचा, तो त्यांच्या इच्छेनुसार !...त्यांनींच ठरवल्याप्रमाणें पैसे घेऊन जायला !

पण म्हणजे, माझ्या कर्जाची वसूली करायला नव्हे...( त्यांचा सावकार होण्याइतका मोठा पेढीवाला नव्हतों कांहीं मी !-- ) धर्म-राजकारणाचं कारण सांगून धर्मदाय फंडगुंडगिरीहि नव्हती चाललेली माझी ती !

मी नेत असे ते पैसे मात्र माझेच होते. व्यवहारानेंच माझं तेवढं देणं लागत होते ते ! म्हणजे काय नि कसलं कोडं बरं हें ?

पैशाचा-देण्या-घेण्याचा-व्यवहार, हा जगांत विशिष्ट परिस्थितीनें तयार होतो. नि चालला तर तो विशिष्ट परिस्थितींत,... विशिष्ट परिस्थितीमुळेंच चालतो.

म्हणजे असं...ते जें माझं देणं लागत होते, तें त्यांच्या अत्तराच्या ( माझ्या मासिकांतल्या ) सहा महिन्यांच्या जाहिरातीचे पैसे होते !—देणं असल्याचं त्यांना कबूल होतं; नि येणं कोणीहि कबूल करतोच कीं ! !

卐

अगदीं जाहिरात वाचतांक्षणींच, त्यांच्या दुकानावर ( पांचदहा रुपयांच्या नोटा घेऊन ) ग्राहकांच्या उड्या पडाव्यात, इतके आमचे वाचक अत्तरगुलाबीचे विशेष शौकीनरंगेल होते, असं म्हणायला माझ्याकडे पुरावा नाहीं. किंबहुना, एकही गेला नसावा, अशीच उलट मला मनांत खात्री आहे !

बरं, दृष्ट ओळखीच्या भिडेला वळी पाडूनहि मी ती जाहिरात त्यांच्या-कडून उपटली नव्हती. ते कनोजी उत्तर हिंदुस्थानी क्षत्रीय; तर मी महाराष्ट्रीय गौड ब्राह्मण!...यासंबंधापूर्वी त्यांची माझी जन्मांत गांठभेट नव्हती. वय, शिक्षण, आवडीनिवडी, उद्योगधंदा...सर्वच बाबतींत आम्ही परस्परभिन्न!

ते पंचेचाळिशी पुढले; तरी अजूनहि रोज शें-शंभर जोर-बैठका ते नेमानें घुमवणारे,... पिळदार अंगाचे पहिलवान!...तर मी चष्मा सांभाळत, ट्राम-बस पकडत फिरणारा, पंचवीशी आंतला एक काडीपहिलवान! त्यांना कुस्त्याभजनांचा शौक; तर मी पुस्तकांतच डोकं खुपसून बसणारा, क्वचित् न्हाणीघरांत सिनेमा-संगीत गुणगुणणारा नि एरवी उच्च वाङ्मयाचा घरोघर रतीब घालत असल्याचा उद्धट पुकार करणारा,...एक मराठी शौकिन संपादक!

केवळ अपघात म्हणूनच माझी त्यांची ती जगातील भेट!—

नि म्हणूनच मला ती घटना वारंवार आठवते!—

卐

घट्ट मनानें,... 'नकार–लेक्चर' नि बेफिकीर बोलणं जाणून बुजून पदरांत पाडीत, 'काळबादेवी' ला जाहिरातीची कौल लावून फिरण्याचा, 'मा फलेषु' वृत्तीचा कर्मयोगी खटाटोप चालवला होता मी, त्या दिवशीं! अनेक दुकानं त्या जाहिरात-चाकोरींतून भरडून, 'नकार-परंपरा' झाल्यावर, योगायोगानेंच मी त्या दुकानावर जाऊन आपटलों होतों.

गिऱ्हाइकाचं चिटपांखरूं नाहीं; चिंचोळं नि त्यांत पुन्हां अत्तराचं दुकान! आंत शिरायला प्रथम मन तयारच नव्हतं. पण तो साराच प्रयत्न बिनखर्चाचा, बिनभांडवलाचा!...तेव्हां मी आंत पाऊल टाकलं; पुढं गादीवर तीनचार अंक टाकले; नि जाहीरातीसाठीं शब्द टाकण्यासाठींहि 'सूतोवाच' केलं.

बैठकीवर बसलेल्या माझ्या मिशांच्या त्या शेटजींनी चार दोन मिनिटं अंक चाळले; नि शेवटीं, कव्हरवरील जाहिरातीची (व्यवहार धोरणानें पाहतां) जरा 'उद्धट' चौकशी केली. तेवढ्यांत, रस्त्यानें जातां जातां कोणीसं थबकून म्हटलं—"नमस्कार...उस्तादजी!" माझ्यासमोरच्या शेटजींनीं हंसून उलट नमस्कार केला.

नांव मोठं गमतीचं वाटलं मला—'उस्तादजी!'

मनांतली जाहिरात-रस्सीखेंच मला जरा नमवीत होती म्हणून; नाहीं तर वाटत होतं," जाहिरातीसाठीं कव्हरवर उड्या घेण्याच्या गोड गप्पा मारणाऱ्या या 'वस्तादा'चा लागलींच निरोप घ्यावा; नि पुढल्या एखाद्या 'यशस्वी' खटपटीला तरी लागावं !..."

पण तेवढ्यांत 'उस्तादजीं'च्या गड्यानें आणलेल्या दोन शरबत ग्लासांपैकीं एक आग्रहानें माझ्यापुढें करून, दुसरा स्वतःच्या तोंडाला लावीत ते संथपणें म्हणाले—"ये तो हमारा छोटासा धंदा ! जाहिरातका क्या उपयोग होगा, बाबूजीऽ ?"

'असल्या सरबती गोडपणापेक्षां सरळ नाहीं म्हणून मला सोडवा कीं !' रिकामा ग्लास पोऱ्याकडे देतांना माझ्या मनांत आलं.

पण उस्तादजींनी आमचे सारे अंक पुन्हां चाळले नि माझ्याकडे सस्मित पाहून पृच्छा केली, "परंतु आपका मासिक पुस्तक तो अच्छा और आकर्षक भि मालुम होता है ! मैं तो मरेठी नहि जानता !...तो क्या ये मरेठी उच्च साहित्य का आदर्श है ना ?...साहित्य को मैं तो बहुत मानता हूं, बाबूजी !—"

" हां हां !" मराठी संपादकांतला जाहिरात एजंट जागा होऊन, तेवढं तरी हिंदी ठांसून बोलूं शकला वेळेवर !

" तो ठीक, बाबूजी ! इसका छ महिनेका दाम क्या होगा ?" एका छापील जाहिरातीवर बोट फिरवीत वस्तादजींनी पृच्छा केली.

तो उंदीर-मांजराचा खेळच असल्यासारखं मला स्पष्टपणें वाटत होतं: तरीं देखील 'अडल्या हरी'च्या भूमिकेंत मी सवलतीची आंकडेमोड करून सत्तावीस रुपये आठ आणे सांगितले.

'अच्छा आज तो नहीं ! परंतु दीवालीके मोसमसे जाहिरात जरूर सुरू करना !'—

प्रथम मला तें खरंच वाटेना; मनांत संशयच खूप आला. पण खूष करण्यासाठीं त्यांना अंक परत देऊन मी स्वतःची अधिक खात्री करावी म्हणून त्यांना विचारलं—" जाहिरातका मजकूर ?"

" क्या ? आपही संपादक हैं ना ?" वस्तादजी सहास्य म्हणाले " तो आपही आपके ध्यानमें आवे वैसा लिख दो ! इस्से जादा मैं अंज्ञ इसमें आपको क्या बतावूं ?—दुकान का नाम और आप चाहे वैसा मजकूर !... बस्स ! "

मी पायऱ्या उतरण्यापूर्वी त्यांनीं एक त्रेतायुगांत छापलेली हिंदी जाहिरात माझ्या हातीं दिली; अत्तराचा बोळा करून माझ्या कोटाला अडकवला व सहास्य नमस्कार केला

वस्तादजींच्या त्या गूढ वागणुकीनें, त्यांच्या अत्तराच्या कायम जाहिरातीनें,.. कीं हातांतल्या त्या अत्तराच्या बोळयाच्या घमघमाटानें,... कोण जाणें... माझं डोकं धुंद झालं होतं.

वित्तंबातमी सांगायची म्हणजे,...अॅडव्हान्सचं सोडाच...पण नव्या मासिकांच्या जाहिरातींच्या कॉन्ट्रॅक्ट फॉर्मना, (अगदी जाहिरात छापल्या नंतरच्या बिलांनाही) कांहीं अर्थ नसतो. ही जाहिरात तर त्यांत आणखी तीन महिन्यांनी सुरू व्हायची! ब्लॉक हातांत नाहीं, मजकूर आमच्या डोक्यांत नि अत्तरवाल्या वस्तादजींचं दुकान नि धंद्याची चलती मी नुकतीच डोळयांनीं प्रत्यक्ष पाहिलेली!—

तेव्हां अगदीं दिवाळी पूर्वीच्या जाहिरातपायपाटींतही मी वस्तादजींच्या दुकानाला दूरच्या धोरणानें टाळलं. कारण मला वाटलं— "खात्री करायला आपण जावं नि फट् म्हणतां ब्रह्महत्त्या व्हावी. त्यापेक्षां मनांत बिल येण्याची जी आशा आहे तीच जास्त सुखद!"

शेवटीं, त्यांनीं दिलेलं तें जुनाट जाहिरात-चिठोरं शोधून काढून त्याच्या मदतीनें केलेली जाहिरात आमच्या दिवाळीच्या अंकांत एकदां अवतीर्ण झाली!

...एवढंच नव्हे, तर माझे पुढले पांच अंकही वस्तादजींच्या अत्तरानें मी सुगंधीत केले.

卐

त्या अवधींत फक्त दिवाळीच्या नंतर एकदांच वस्तादजींचं घमघमणारं एक पाकीट मला आलं. आंत हिना व खस यांचे दोन छोटे बोळे नि बोटभर चिठी होती—एक बोट भरच!—

चिठींत मजकूर होता —"संपादक महाशय—

शुक्रिया! जाहिरात और जाहिरातका स्थान मनपसंद.

—कृपाभिलाषि उस्ताद."

मी मात्र कामाच्या सबबीवर त्या काळांत वस्तादजींना एकदांही भेटलों

नाहीं. कारण सारा व्यवहार तोंडी नि जुना होता; विचारांतीं, जाहिरातबाबतच्या कोठल्याही नव्या मासिकाच्या धोरणी प्रथेप्रमाणें त्या छापलेल्या जाहिरातींचीं विलं पाठवण्याचा, व्यवहारी पण घोक्याचा मार्गही मी प्रयासानें टाळला होता.

आणि योगायोग असा, कीं चालता धंदा नि बंद धंदा यांच्या 'मागील वसूली' च्या प्रश्नांतील जमीन-अस्मानी फरकाचा प्रत्यक्ष अनुभव येण्याची माझ्या'-वर शेवटीं पाळी यायला नि तेव्हांच उस्तादजींच्या जाहिरातीची सहा महिन्यांची मुदत संपायला एक गांठ झाली !...

अगदीं ओळखीचे वर्गणीदार, एजंट नि जाहिरातदारही तोंड वळवतांना किंवा कानावर हात ठेवतांना पाहून, येण्याच्या कागदी हिशेबांत अनोळखी वस्तादजींचं नांव मी साहजिकच बुडित-यादींत घालून मोकळा झालो होतों.

तरी पण शेवटीं, खात्री करून घेण्यासाठीं, एके दिवशीं सर्व बिलांच्या भुतांना उठवून मी माझ्याबरोबर घेतलं; नि जवळजवळ नऊ महिन्यांनीं वस्तादजींचं चिंचोळं दुकान पुन्हां एकदां शोधून काढलं.

卐

चार मंडळी दुकानांत जमून वस्तादजींबरोबर गप्पा मारीत होती.

अशावेळीं मी दबकत दबकतच बैठकीवर जाऊन बसलों.

मित्रांशीं बोलतां बोलतां थबकून, क्षणभर माझ्याकडे ओळखीच्या नजरेनें पाहून, वस्तादजी आस्थेनें म्हणाले–'आइएऽ महाशय !'

सर्वांबरोबर पुढें आलेला सरबताचा ग्लास घशाखालीं उतरल्यावर, मी हळूच खिशांतून काढलेलीं बिलं पुढें केलीं.

वस्तादजींनीं ती न पहातांच पेटींत टाकलीं; नि पूर्वीसारखाच एक अत्तराचा बोळा माझ्या हातीं देत ते म्हणाले–"आपको तकलीफ पडेगी, संपादक महाशय! परंतु... आते गुरुवार शाम आना !--"

...लक्ष्मीदेवीचा कौलच मिळाला होता तो मला !—

卐

त्या आश्चर्याच्या धक्क्यातून जागा झाल्यावर, मी दोन दिवसांनी वस्तादजींकडे गेलों; तेव्हां ते दुकानांत एकटेच होते;...बराच वेळ मी बसलों; त्यांची दत्ताची पूजा चालली होती; मग पेढे, सरबत सर्व झालं; मला रीतसर अत्तराचा

धोळा देऊन, ते शेवटीं मला म्हणाले—"देखीये! मैं एक गरीब आदमी हूं; अभी जाहिरात कृपया बंद रखना!—"

त्यांच्या त्या आदबशीर शब्दांत डोकावणारं (आमच्या मराठी 'भारदस्त' मासिकांच्या भवितव्याबद्दलचं) अज्ञान मला सहन होईना; तसं पहातां व्यवहारी दृष्टीनें थोडा धोका होता: तरी मी त्याना (मासिकच बंद पडल्याची) सारी खरी खरी वस्तुस्थिती सांगितली.

'अरर्' एवढे दुःखसूचक शब्द उच्चारून वस्तादजी गप्प झाले; त्यांचा चेहराहि थोडा पालटला.

क्षणभरानें मी हळूच दबल्या आवाजांत विचारलं, "झालेल्या बिलाचे—"

"हां! देना तो जरूर! हरगिज देनाहि पडेगा!" माझ्या प्रश्नावर वस्तादजी पटकन् नि मोठ्यानें म्हणाले; पण मग किंचित थांबून म्हणाले... "परंतु देखीये, महाशय, एकदम एक दफेमें तो इतनी रकम देना मुझे मुष्किल पडेगा!"

तें नकारघंटेचंच अपेक्षित परिचित 'सूतोवाच' समजून मी गप्प बसलों.

तेवढ्यांत वस्तादजी दुकान बंद करायला उठत मला म्हणाले—"धक्का खानेकी और तकलीफकी बाब होगी! परंतु दर गुरुवार शाम को आप इधर कृपा करके आना! घंटा देडघंटा ठेरना...दत्ताजींका प्रसाद और शरबत ग्रहण करना!... और जातेवख्त उस्ताद जो कुछ रुपया दो रुपया दे देगा ये भी लेके जाना! क्या? ख्यालमें आया होगा ना?"

तसली वसूली म्हणजे एक तारेवरचा नाचच होता; पण त्यांतही मला एक नवनिच गंमत वाटली. मनांत म्हटलं—"कांहीं हातीं नाहींच लागलं, तर निदान हा वस्ताद किती वस्ताद माणूस आहे, तें तरी पाहूं जवळ बसून!—"

मी नमस्कार करून जाऊं लागतांच, दुकानाचं बंद कुलुप एकदोनदां खडखडवून पहात, वस्तादजी माझ्याकडे वळून सस्मित म्हणाले— "भूलना नहीं, महाशय!...दर गुरुवार शाम!....तकलीफ माफ!..."

卐

पुढच्या गुरुवारीं संध्याकाळीं मी काळबादेवी रस्त्यानें जात असतां मनांत म्हणत होतों..."कसला सापडतोय् तो वस्ताद—आपण येणार हें नक्की ठाऊक असल्यावर?"

आणि दुकानांत शिरल्यावरही तोच अनुभव आला. 'वस्तादजी आज येतीलच असं नक्की नाहीं.' मला आतां परिचित झालेला त्यांच्या दुकानांतील तो पोऱ्या म्हणाला.

तेव्हां, लबाड अघळपघळ बोलणाऱ्या, व्यवहार मांडून बसलेल्या जगांतल्या सगळ्या वस्तादांना मनांतल्या मनांत शिव्या देत, थोड्या रागांतच परत फिरण्या-वांचून मला दुसरं गत्यंतर दिसेना !

पण त्या गूढामुळेंच मात्र तिसऱ्या गुरुवारीं वस्तादजींची पुन्हां आठवण झाली मला !

यावेळीं वस्तादजी भेटले. (आदल्या गुरुवारीं, बेत ठरवून, एक प्रसिद्ध कुस्ती पहायला ते गेले होते. ) मला त्रास पडल्याबद्दल त्यांनीं आपण पूर्वी कस-कशा कुस्त्या खेळलों होतों, आपले शिष्य कसे आहेत, वगैरे विविध रसभरित वर्णनहि केलं माझ्यापुढं.

पण प्रसाद, सरबत नि अत्तर या प्रत्यक्ष गोष्टी नि पुढील गुरुवारचं आणखी एक अप्रत्यक्ष आश्वासन, याशिवाय त्या दिवशींही कांहीं मिळालं नाहीं !

त्या दिवशीं परततांना तर पैशाबद्दलची अधिकच निराशा नि जगांतील व्यवहाराबद्दलची भयंकर खिन्नताच माझ्या मनांत भरून आली होती.

卐

तरीहि चौथ्या गुरुवारीं, व्यसनी मनुष्य जसा गुत्त्याकडे जातो, तसा (पूर्ण निराशा मनांत ठेऊनच) मी वस्तादजींच्या व्यवहारी गूढाकडे आकर्षिला गेलों.

नेहमीप्रमाणें बऱ्याच गप्पा झाल्यावर, शुक्रवारच्या एका भजनी मेळ्याला मला आमंत्रण देऊन, ते बैठकीवरून उठले.

आणि मग, जणूं सहजच खालीं वांकून, पेटींत असलेले सगळेच सहा रुपये त्यांनीं बाहेर काढले; दोनदां ते मोजले; आपले खिसे चाचपले; नि मग ते सहाहि रुपये माझ्या हातीं पटकन् देऊन ते म्हणाले,... "आपका तीन गुरवारका हिसाब तो हो चुका ना, बाबूजी?"

त्यावेळीं माझ्या अंगांतून सरकन् एक अनपेक्षित नि अननुभूत भाव-नांची लाट उठून गेली. जगांतला तो प्रत्यक्ष अनुभव मला स्वप्नवत् नि अगदींच अतर्क्य वाटत होता—

माझ्या मनांतील आजपर्यंतच्या त्यांच्याबद्दलच्या कुत्सित कल्पनांबद्दल क्षणभर माझी मलाच भयंकर लाजहि वाटली !...

मला वाटलं—"वस्ताद वस्ताद माणूस नाहींत! वस्ताद हा माणूस आहेत!"

卐

त्या पुढल्या तीन गुरुवारीं, वस्तादजींच्या गप्पा, पेढे, सरबत नि (तीन अधिक एक, अधिक दोन, असे) आणखी सहा रुपये इतक्या गोष्टी माझ्या वहींत त्यांच्या खात्यांत जमा झाल्या होत्या.

त्या पुढे दोन आठवडे साफ रिते गेले. त्यांतल्या शेवटच्या आठवड्याला वस्तादजींनी त्यांच्या दोन शिष्यांच्या कुस्तीच्या (त्यांनींच पुढील गुरवारीं ठरवलेल्या) समारंभाचं एक तिकिट मला बक्षीस दिलं.

आपण न भेटण्याची ती त्यांची नोटीसच होती मला. पण मी मात्र गुरुवारीं कुस्ती पहायला जाण्याची चिकाटी ठेवली.

त्यावेळची वस्तादजींची आवेशपूर्ण समरसता मला मोठी अभिनव नि गंमतीची वाटली. आपल्या दोन्ही शिष्यांची बरोबरी झाल्यावर, त्यांना दोन बगलेंत कौतुकानें घेऊन, ते गर्दीत उभे असतांनाच, तेथून मी काढता पाय घेतला.

पुढल्या गुरुवारी त्या कुस्तीविषयीं बोलण्यांतच वस्तादजी रंगले होते. त्यांनी किंवा मी कोणीच पैशाची गोष्ट काढली नाहीं.

शेवटीं, उठतां उठतां मात्र, त्यांनी नवी बातमी मला सांगितली—महिना-अखेर तें दुकान काढून टाकून ते कनोजाला परत जाणार होते !

卐

खरंच माणसाचं मन मोठं स्वार्थी नि गुंतागुंतीचं असतं !

नऊ महिन्यांपूर्वी वस्तादजींच्या दुकानांत मी प्रथमच पाऊल टाकलं; तेव्हां मला कसलीच आशा नव्हती. पुढें त्यानी जाहिरात दिल्यानंतरच नव्हे, तर ती सहा महिने छापून झाल्यावरही, मला कसली मूर्त अपेक्षा नव्हती. एवढंच काय, पण पहिले तीन गुरुवार त्यांचे पेढे-सरबत खाऊन-पिऊनही, मला कशाबद्दलच खात्री नव्हती.

पण तरी देखील, त्यापुढील महिन्याभरांत त्यांनी मला अनपेक्षित बारा रुपये दिले होते. अजून साडेपंधराचा हिशेब उरला असला, तरी त्यांचं आतांपर्यंतचें प्रेमळ आदरातिथ्य मी मनमुराद आस्वादित आलों होतों.

पण मग ‘दुकान काढून, मुलखांत जाणार’ ही आडपडदा न ठेवतां त्यांनीच सांगितलेली बातमी ऐकल्यानंतरच्या गुरुवारीं त्यांच्या दुकानाकडे वळतांना, एक दुष्ट विचारी संशय माझ्या मनांत वारंवार डोकावत होता— “वस्तादजो दुकान मोडून गेलेलेच तर दिसणार नाहींत ना आपल्याला आज?”

माझ्या त्या स्वार्थी मनांत असं मात्र आलं नाहीं, कीं, अगदीं पहिल्या अगर पुढच्या कोणत्याहि गुरुवारीं (आपलं दुकान आहे तिथंच कायम ठेवू-नहि) वस्तादजोंना, एका क्षणांत, मला वाटाण्याच्या अक्षता व काळबादेवीचा रस्ता दाखवता आला असता!

卐

पण माझं मानवी मन तसं कितोहि वाकड्यांत शिरलं, तरी वस्तादजी मात्र मी तिथं पोहोंचण्यापूर्वीच दुकानांत येऊन बसले होते.

आजहि दर गुरुवारप्रमाणेंच सर्व झालं; नि शेवटीं, ते माझ्याकडे सस्मित पहात म्हणाले— “हा! अभि कुछ् कहियें, महाशय!”

पूजेपूर्वी बराच वेळ आमच्या गप्पा झाल्या होत्या; त्यांत आपला बेत नक्की झाल्याचंच त्यांनी मला पुन्हां सांगितलं होतं.

“एकाकी मनुष्य; एक लहानसं मालकीचं घर; लहानपणापासून तालमीचा नाद; आपला एक आखाडा होता. एका चुरशीच्या कुस्तींत उजव्या पायाचं हाड मोडलं; तीन वर्षांपूर्वी औषधोपचारासाठीं मुंबईंत आलों. मालीश वगैरे उपचार चालू असतां, दिवसभर मनाला करमणूक म्हणून हें दुकान काढलं; एक कनोजी मित्र अत्तराचा धंदा करतो म्हणून दुकानांत अत्तरं ठेवलीं. तीन वर्षांत मुंबईंतही मित्र झाले. भजनी मेळे केले. कुस्त्या पाहिल्या-करवल्या; आतां पाय जरा बरा आहे; तेव्हां मुलखाला परत जाण्याचे दिवस आले. स्वतः कुस्ती नाहा यापुढें मारतां येणार. पण कुस्ती मारणारे जवान तालमींत तयार करूं! उरला वेळ साहित्य वाचूं!—हाच आतां आपला आवडता धंदा!–” वगैरे ते खूप बडबडले होते, माझ्याकडे!

माझा त्यांचा आतां इतका परिचय झाला होता, कीं, तें ऐकल्यावर, त्यावेळीं, आपला एकादा नातेवाईकच दूर देशाला कायमचा जात असावा, इतकं दुःख वाटलं होतं मला!—

卐

पण तेवढ्यांत पेटी उघडून वस्तादजींनी एक दहा रुपयांची नोट चटकन् माझ्या पुढें केली नि ते म्हणाले—" आप कहोगे वस्तादजी बहोत बुरा आदमी था! माफ कीजीयेगा, बाबूजी! आपको मेरे लीये बहोत तकलीफ उठाने पडी!— अच्छा! तो आते गुरवार भि आप आना! आपका बाकी सब आने पै तक चूकती होगी!"

ती नोट नि वर आणखी वस्तादजींचे ते शब्द ऐकून मात्र माझं हृदय पार विरघळलं!—अगदीं अभावितपणें माझ्या डोळ्याच्या कडाहि ओल्या झाल्या;... न बोलतांच कंठ दाटून आला.

मी जरा खाकरून म्हटलं,—" असं काय बरं, वस्तादजी? अगदीं सारंच्या सारं देऊन असं लाजवूं नका, बुवा!—आतां उरलेला साडेपांच रुप-यांचा हिशेब स्नेहाखातर तोडून टाकण्याची संधी तरी मला द्या! माझ्यावर मोठे उपकार होतील आपले!—"

वस्तादजी हंसले व म्हणाले—" अच्छा, महाशय! जैसी आपकी मर्जी!— मैं भी मुलुखमे आपके ये बाकी दामकी और आपकी कभी कभी याद करूंगा!-"

卐

नि पुढल्या गुरुवारीं मी केवळ स्नेही या नात्यानें शेवटच्या भेटीसाठीं वस्तादजींच्या दुकानाकडे वळलों.

दत्ताचे पेढे, सरबत, उदबत्तीचा घमघमाट नि वस्तादजींच्या अत्तराचा बोळा! सर्व आतां माझ्या अगदीं अंगवळणीं पडलं होतं!

त्यांच्या दुकानांत मला नेहमीं नर-नारायणाची भेट झाल्यासारखं वाटे!—

पण तिथं गेलों, तों दुकानाला कुलुप होतं; दारावर गुजराथी पाटी होती — " दुकान भाडे आपवानुं छे!"

卐

कुठले वस्तादजी नि कुठला मी?—कुठल्या कारणानें आमची ओळख झाली? वाढली,...संपली!— नि आतां वस्तादजी मुलखालाहि गेले. माझी त्यांना आठवण कधीं कधीं होईल असे ते म्हणाले होते खरे! पण व्यवहाराशिवाय त्यांच्या बाबतींत मी कांहींच केलं नव्हतं, माझी त्यांना आठवण यायला!

उलट त्यांनीं मात्र माझ्यापाशीं असामान्य औदार्य, प्रेम नि माणुसकी दाखवली होती ! अगदीं व्यवहारांत सुद्धां ते असामान्य माणुसकीनें वागले...

व्यवहाराच्या दारांतूनच ते माणूस म्हणून माझ्या मनाच्या घरांत शिरले होते ! आणि तिथंच त्यांची कायमची स्थापना झाली होती !

卐

नि म्हणूनच—चालू आयुष्यांतल्या कठोर व्यवहाराची झळ मला कधीं असह्य झाली नि मन अगदीं बेचैन झालं...किं ( दर नाहीं तरी निदान एखाद्या गुरुवारीं तरी ) मी मुद्दाम एक नंबरच्या ट्रॅमनें त्या बाजूस जातो; नि ते परिचित चिंचोळं दुकान जवळ येऊं लागलं, कीं... तिकडे भिरभिऱ्या दृष्टीनें खिडकींतून उत्सुकतेनें पाहूं लागतो.

त्याचं बदललेलं बाह्य स्वरूप माझ्या दृष्टीसमोरून विरतं; नि तिथं माझ्या दृष्टीला वस्तादजींची ती भव्य प्रेमळ मूर्ती, पेहलवानी थाटांत तिथल्या गादीवर बसून, येणाऱ्यांना जाणाऱ्यांना अत्तरानें चपचपलेले बोळे वाटत आहे, सरबत-पेढे आग्रहानें देत आहे, उदबत्ती-कापूर दत्ताभोंवतीं ओवाळत आहे, असा सारखा सारखा भास होतो मला !

—आणि म्हणूनच ट्राम पुढं निघून जाऊं लागली, तरी सारखं पुन्हा पुन्हा मागं वळून, मी स्वतःशीच मनांतल्या मनांत म्हणतों— " हं ! पाहिलंस ! हेंच होऽते उस्तादजींचं देऊळ !! "

" घ्याऽना चहा ! निवेऽल मग..." आल्यापासून विनायक मास्तर अंग चोरून गप्प गप्पच खुर्चीवर बसलेले पाहून तात्या हळुवार शब्दांत त्यांना म्हणाले.

विनायक मास्तरांचं धोतर मळलेलं–विरलेलं,...दोन तीन ठिकाणीं कप्प्या लावून शिवलेलं; कोट अंगाला आखुडलेला; सदऱ्याच्या गुंड्या वरखालीं झालेल्या; नी रंग गेलेल्या टोपीला सत्राशेंसाठ पोचे आलेले...

कानाजवळ हळूच लोंबून त्यांच्याशीं गुजगोष्टी करणारं टोपीच्या आंतलं चामडं किंचित् ओशाळ्या मनानें आंत ढकलून, त्यांनीं आपल्या काळ्याभोर भरघोस मिशांतून आपली स्वच्छ दंतपंक्ति क्षणभर दाखवली न दाखवलीसं केलं; नी कप हातीं घेत ते हळूंच अस्पष्ट पुटपुटले " होऽ घेतोंऽकीं..."

चहा पितां पितां मास्तर आपल्या सभोंवतीं गोंधळल्या नजरेनें चुळबुळत कसलासा विचार करीत होते. शेवटीं रिकामा कप त्यांनीं खुर्चीखालीं ठेवला; पुन्हां पूर्वींसारखेच ते खुर्चीवर अंग चोरून बसले; नि आपले हात कोपरांत दुमडून त्यांनी ते छातीशी घडी करून ठेवले.

— २ —

हाताची घडी घालून मास्तर बसले होते; त्यांची दृष्टी अकारण चोंफेर फिरत होती. त्यांचं मन मात्र दूर दूर भटकत होतं; हो,... भूत नि भविष्यांत.

फायनल झाल्यावर परिस्थितीनेंच त्यांचा पेशा आपोआप ठरला होता. तरी पण खेडेगांवच्या शाळेशी नि पार्टटाईम पोस्टाशीं त्यांचा तसा संबंध आल्यावर मात्र त्यांच्या कामसू इमानीपणामध्यें नि ईश्वरदत्त बुद्धिमत्तेंत त्यांनीं कधींच कसलीच कुचराई केलेली नव्हती. यंत्रासारख्या झालेल्या आयुष्यांत त्यांचं माणसाचं मनच सदा सर्वदा जिवंतपणा आणी. लहानग्या बाळांच्या मनांचा ओलावा ( त्या सतत संसर्गानें ) त्यांच्याहि मनाला आला होता.

घरच्या संकटपरंपरेतूनहि निवृत्तिपर प्रवृत्ति नि प्रवृत्तिपर निवृत्ति यांचा सुंदर संथ समन्वय साधूनच त्यांनी बारा वर्षांच्या एका तपाची ती तपश्चर्या केली होती. आणि या तपश्चर्येनेंच त्यांच्या चेहऱ्याला, हालचालींना, बोलण्याला, वागणूकीला एक प्रकारच्या भकास संयमाचा मुलामा चढला होता.

त्यांच्या चेहऱ्यावरील ती आजची भावशून्यता या अनुभवी निष्ठुर ठोकताळ्यामुळेंच अधिक घनघवित झाली होती व त्यामागें खऱ्या रसरशित भावना आजपर्यंत बेमालुमपणें दडत आल्या होत्या. इतक्या... कीं, कोणालाहि पहातांच वाटावं–' काय गद्य माणूस आहे हा!–'

अजीजीनें भरलेले अनेक अर्ज पाठवून मास्तरना ट्रेनिंगचा एक वर्षाचा चान्स मिळाला, त्यावेळींच कायतें त्यांचं हें अव्याहत यंत्र थोडं थांबलं होतं. पण त्या वर्षी त्यांनीं आपल्या हाडाचा काडं नि मनाची माती होईल, इतकी...पैशाची, भावनांची, नि सुखदुःखांची काटकसर केली होती. आणि तो त्रास घेऊन परतल्यावर झालेल्या सूक्ष्म वढतीनें त्यांना क्षणभर आनंद मिळाला असला,...तरी पुढील पुरी तीन वर्षं (आपल्या बटव्याचा सुटलेला बंद पुन्हां घट्ट करून) आपला गेलेला तोल फिरून संभाळायला त्यांना पुरलीं नव्हतीं. ते ठेंचकळले होते; रक्तबंबाळले होते!—

तरी या महागाईनें मात्र पुढं पुढं त्यांच्यापुढं रुखरुख–धडपडीचं एक कायम भरलेलं ताटच वाढून ठेवलं; त्यानेंच जणूं पोट भरल्यामुळें त्या कोकणच्या खेड्यांत त्यांनी अलीकडे कधीं कधीं कित्येक आठवडेच्या आठवडे नुसत्या पेजेवर नि परसांतल्या फणसाच्या भाजीवरच घरांतल्या मुलींसकट सर्वांचा जठराग्नि शांत करण्याचे यशस्वी प्रयोग करून पाहिले होते. तसल्या परिस्थितींतहि संसार पुढं चालू होता;... वाढत होता. आपली झांकली मूठ सव्वा लाखाची ठेऊन, आपला आब राखून, मास्तर पुढं वाटचाल करत होते.

आज मात्र त्यांच्या डोळ्यापुढं काजवे चमकले होते. वर्तमान काळानें ते भयंकर नडले होते. मोठ्या चमत्कारिक व्यूहांत पडल्यासारखं त्यांना वाटलं होतं. क्षणभर आपल्या साऱ्या आयुष्याचा आढावा घेऊन, त्यांना सात्विक संतापहि आला होता. ' भावी पिढीच्या मनाचे शिल्पकार!' ते तुच्छतेनें स्वतःचा उपहास करून आपल्या एकमार्गी प्रामाणिक संतुष्ट वृत्तीच्या जीवनाचा धिःकार करत होते.

अखेर त्यांना काय वाटलं कोण जाणें—पुन्हां पुन्हां स्वतःचं मन वळवून, त्यांनीं तीन रुपये खर्चून थेट मुंबईची वाट धरली होती. नि दबकत दबकत असा तात्यांच्या फ्लॅटमध्यें प्रवेश केला होता.

पण काय बोलायचं, कसं बोलायचं, केव्हां बोलायचं... त्यांचं कांहीं ठरलं नव्हतं!... आणि त्यामुळेंच सदाच्या अबोल मास्तरांच्या तोंडाला आज तर जवळ जवळ साफच कुलूप पडलं होतं, तात्यांसमोर खुर्चीवर बसल्यापासून—

— ३ —

"सुटी पडली असेल आतांऽ?—" तेवढ्यांत तात्या सुपारीचं खांड पुढं करून बोलणं सुरूं करण्यासाठीं सहज म्हणाले.

"सुटी? आमच्या खेडवळ शाळेला होऽ कसली आली सुखाची सुटी?—" मास्तर आपल्या मिशा धोतरानें पुसून हंसल्यासारखं करीत म्हणाले, "आम्हीऽच आपली घेतोंऽ झालं सुटी! ग्रामपंचायतीनें पंधरा दिवसांत दिवाळी संपवा, म्हटलंय्! माझ्या तीन शिकवण्याहि सध्या बंद झाल्यात्!...तेव्हां..."

"हं हं!—अस्संऽ?" तात्या कांहींतरी बोलले खरं;... पण विनायक मास्तर आज असे खेड्याहून पदरचे पैसे खर्चून मुंबईला एकाएकीं का आले असावेत,... तें कांहीं त्यांना समजत नव्हतं!—

"श्वशुरांचं कोकणाहून पत्र आलंय्..." मास्तर तेवढ्यांतच संकोचानें पुढं...म्हणाले, "नि माझ्या घरांत महिन्यावर बाळंतपण आलंय्...बरं गोटी तर सध्यां बंद...तेव्हां..."

आणि पुन्हां इतकंच अर्धवट सोडून मास्तर संकोचानें थांबले.

तात्या त्यांच्याकडे कुतुहलानें, गांभीर्यानें नी आपुलकीनें पहात राहिले. पुढली शांतता असह्य होऊन अखेर ते जरा सहानुभूतीच्या हळुवार शब्दांत म्हणाले—"मग माझ्याकडे कांहीं विशेऽष काम होतं कां, मास्तऽर? सांगाऽना! संकोच नको! मीऽ कांहीं परका नाहीं तुम्हाला!..."

मास्तरांचे डोळे किंचित्‌काळच चमकले;...चेहरा पालटला;... त्याच्यावर भावनांची भाऊगर्दी झाली. पण मग दुसऱ्या क्षणींच त्यांत पुन्हां त्यांचं जन्मजात दैन्य ओथंबलं!

आणि शेवटीं;... अत्यंत हलक्या आवाजांत पुटपुटतच त्यांना ते म्हणाले, "मलाऽऽ तात्याऽ तुमच्याऽकडून— अंऽऽ... थोडीशी मदत पाहिजे आहे!... एक पंचवीस रुपये हातऽउसने दिलेत मला आऽज,...तरऽऽऽ दिवाळीनंतरचा पगाऽर नी शिकवण्यांचे मिळूऽन..."

— ४ —

त्या उद्गारांनीं तात्या केवढ्यानें तरी दचकले! पण त्यांनीं तें शक्य तितकं सारं आंतल्या आंत दडपलं; आणि खुर्चीवरून उठत ते मास्तरांना म्हणाले, "वा:ऽ वा:ऽ विनायक मास्तऽर...तुम्ही तर फारऽच बुवा...अगदीं हेऽऽ—!"

आणि मग तात्या पटकन् कोपऱ्यांत गेले; त्यांनीं कपाटांतून चार नोटा काढल्या नी त्या विनायकमास्तरांपुढें करून ते म्हणाले,... "सुटे नाहीं आहेत, मास्तर! पण तुम्ही चारी ठेवा सध्यां!...कमीअधिक जवळ असलेले बरें! मग बघूं आपण हिशेब... देणं घेणं...!"

मास्तर क्षणभरच थोडे घुटमळले. पण मग त्यांनीं एक शब्दहि न बोलतां चारी नोटा आपल्या खिशांतील जाळीच्या बटव्यांत कोंबल्या आणि थोडावेळ किंचित् आर्द्र डोळ्यांनीं तात्यांकडे पाहून झटकन् उभे रहात पुन्हां आपल्याशींच पुटपुटल्यासारख्या आवाजानें ते म्हणाले,' "मग मी घेऊं,ऽतात्या,ऽ...आपली रजाऽ...आतांऽ?"

तात्याहि हळूच पाठमोऱ्या फिरणाऱ्या मास्तरांच्या खांद्याला स्नेहाळ हातानें स्पर्श करून हंसत म्हणाले, "या या! कोकणांतून पुन्हां येतांना काजूबीजू आणा बरंऽकां? आणि मुगाचे दगडी लाडूसुद्धां!"...

मोकळ्या मनानें मास्तरहि हंसले व तात्यांच्या ब्लॉकमधून मंद पावलें टाकत बाहेर पडले. त्यांना सारखं वाटत होतं...' किती सुज्ञ प्रेमळ माणूस.'

—५—

खालीं उतरून लांब जात चाललेल्या त्या गरीब मूर्तीकडे तात्या कितीतरी वेळ पहातच होते ग्यॅलरींतून!–

ते परत घरांत शिरतात, तों त्यांची बायको पुढें आली होती! तेव्हां मग तात्या तिला तुटक शब्दांत हळूंच म्हणाले..."काय चमत्कारिक मनुष्य आहे बघ हा?...तुला आठवतं गऽ?...आपण दोन वर्षांपूर्वी हायस्कूलवाचन पुस्तकं छापलीं तें! त्यावेळीं जवळ जवळ तीस पस्तीस लेख मी विनायक मास्तरांकडे नकला करायला दिले होते. त्यानंतर तीं पुस्तकं मंजूर झालीं नी आपल्याला इतका फायदाहि झाला! पण मी अगदीं साफच विसरलों होतों या घटकेपर्यंत, मास्तरांना त्यांच्या श्रमांचे पैसे द्यायचे! एकएक प्रतहि पाठवली नाहीं. त्यांच्याकडे,...बघ! वास्तविक आज अगदीं हक्कानें पस्तीस चाळीस रुपये मागितले पाहिजे होते त्यांनीं माझ्याकडे!...पण आतां हा प्राणी दोन वर्षांनीं असा उभ्या उभ्या येतो काय...नी संकोचानें वीसपंचवीस रुपयेच माझ्याकडे नुसते हातउसने मागतो काय? जगांत काय एकेक चमत्कार आहेत हे!– याला म्हणायचं तरी काय? गरीबीचं सौजन्य,...दैन्य–कीं..?..."

———

परिशिष्ट
दुसरे सात

# मासलेवाईक प्राणी

## [ व्यवसाय ]

( पहिल्या सातांच्या शेवटीं पान ६४ वर ' विद्यार्थ्यांचीं टिपणें ' या सदराखालीं दिलेल्या अभ्यासाच्या कलमांचाहि तुम्हाला या बाबतींत उपयोग होईल. )

[ -१- ]

मन्या, भय्याकाका, विनायक मास्तर, गजाभाऊ या व्यक्तींचें बाह्य स्वरुप अभ्यासून पंधरा ओळींत स्वतःच्या शब्दांत तें आकर्षकपणें मांडा; व तुमच्या दृष्टीने त्याला समर्पक शीर्षक द्या.

[ -२- ]

पुढील घटना त्या त्या व्यक्तिचित्रांत कशा महत्वाच्या आहेत तें स्पष्ट करा—

१) ' सख्या हरि पळाला ' २) संपादकाच्या खोलींत ' रामपंचायतन ' ३) ' दीड आण्याला गोल फेकू ' ४) भय्याकाकांच्या पोषाखाची गल्लत. ६) ' चहा टाकते हं झटकन् ' ७) चार रुपयांची परतफेड. ८) ' अरे ऽ ज्या ऽ रे—थोडे दिन मे मजदूरराज. ' ९) ' गजाभाऊंनी फिरवलेलं रेडिओचं बटन. ' १०) काव्यगायनाच्या बैठकींत चोपड्या फाडणं. ११) ' आपल्या मुलीचं लग्न ठरल्यासारखं काय करतांहां ? ' १२) ' तुमची मानभावी मैत्री नकोय् मला ! ' १३) वर्गांतील ' कारकून-चर्चा ' १४) ' गणपत आलाय आपला आज ! ' १५) ' ही पुढली सगळी किंमत तुमच्यामुळेंच आली मला. ' १६) ' भूलना नहि—दर गुरुवार

श्याम–तकलीफ माफ. ' १७) ' अच्छा महाशय ! जैसी आपकी मर्जी–' १८) ' दुकान भाडे आपवानुं छे.' १९) ' एक पंचवीस रुपये हातउसने दिलेत आज तर–'

[ –३– ]

खालील वर्णनांचा व संवादांचा अभ्यास करा व त्यांचा त्या त्या व्यक्तिचित्रांत कसा उपयोग होतो तें पहा.

१) संपादकाच्या आगमनाची वाट पाहणें. २) मित्राचें संपादकाशीं पहिलं संभाषण. ३) मन्याची चित्रकला, लेखनकला व कांटकसर. ४) मन्या व संपादकाचें संभाषण. ५) भय्याकाका व कारकून ६) भय्याकाका व घरची माणसं ७) भय्याकाका व त्यांचे तरणे मित्र. ८) भय्याकाकांचे ढमढेऱ्यांशी संभाषण. ९) आडकित्त्याचा गोंधळ. १०) गजाभाऊंचा संसार. ११) गजाभाऊंचीं जीवनसूत्रें. १२) ट्रॅमजवळचें गजाभाऊंचें संभाषण. १३) वारयाचा 'समर्थन'–संवाद. १४) आबासाहेबांची बसायची खोली. १५) आबांच्या घरच्या हालचाली. १६) गणपतचा ' सर ' शी पहिला संवाद. १७) गणपत लग्नाचें आमंत्रण करतो १८) उस्तादजींच्या दुकानांतला दर गुरुवार. १९) उस्तादजी सहा रुपये देतात. २०) उस्तादींचें मुलखांत गमन. २१) विनायक मास्तरांचा जीवन–कलह.

[ –४– ]

(४) वर्णनशैलींत खालील सारख्या शब्दयोजनेचा त्या त्या ठिकाणीं कसा जोरदार उपयोग व कसा व्यापक अर्थ होतो तें पहा; असल्या प्रकारची आणखी सूचक शब्द–योजना शोधून अभ्यासा :—

खिन्नतेची परीटघडी, ऐसपैस ठिय्या, यच्चयावत् शिकारखाना, बोलकी आर्द्रता, रसरशित भावना.

परिचित थाप, हिरवट तरुण, निरुपद्रवी नाविन्याची मेजवानी, भरमसाट मंडळाचा तहाहयात सभासद, दिलचस्प गप्पा, बांका वखत, रामबाण जडीबुट्टी.

कमीजास्त किंमतीचा धूर, रटूंधुटूं संसार, एकेरी बोलणं.

मैत्रीचा डोलारा, गोतावळ्याची वित्तंबातमी, जीवाच्या कानानें, कपबशीचं लग्न.

काचा मारलेलं शुभ्र धोतर, डोळ्यांतला ओढलेपणा, खिशाचा अंदाज.

पूर्व-संस्कार-स्फूर्तीप्रमाणें, उंदरामांजराचा खेळ, अडल्याहरीची भूमिका.

निवृत्तिपर प्रवृत्ति नि प्रवृत्तिपर निवृत्ति, भकास संयमाचा मुलामा, हाडाचीं काडं नि मनाची माती, अबोल मास्तरांच्या तोंडाला कुलुप, जन्मजात दैन्य.

[ -५- ]

वास्तविक, व्यक्तिचित्रें खऱ्या जिवंत माणसांची नसलीं तरीहि तीं खरी व जिवंत असतात; म्हणजे काय ? या 'प्राण्यां'च्या अभ्यासात कुठले प्रसंग अगदीं खरोखर घडले असतील असें तुम्हाला वाटतें ? आणि कुठले घडलेले नसले तरी त्या त्या परिस्थितींत अगदीं घडलेलेच वाटतात ? सर्व प्रसंगांची यादी करून त्यांच्या योजक मांडणीचा नि रचनेचा अभ्यास स्वतंत्र प्रयत्नाला फार उपयुक्त होईल; या दृष्टीनें हे सारे प्राणी पुन्हा पुन्हा डोळ्याखालून घाला.

[ -६- ]

i) कांही 'प्राण्यां'च्या व्यक्तिचित्रांत कांही घटना नजर चुकीनें अगर लेखकाच्याच गोंधळामुळें-परस्पर विसंगत झालेल्या दिसत आहेत; अशा घटना सांपडल्या ( आणि एकदोन तरी तुम्हाला नक्की सांपडतील ) तर त्या शोधून प्रस्तुत लेखकाला कळवा.

ii) साऱ्या प्राण्यांतील तुमच्यामतें कोणतेही दोन निवडा व ते इतरांपेक्षा श्रेष्ठ का वाटतात त्याची छाननी सोदाहरण करा.

iii) याच लेखकाच्या इतर पुस्तकांची यादी तयार करून त्यांत इतर अनेक प्राणी आले आहेत त्यांची सवडीनुसार ओळख करून घ्या.

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
क्र. क्र. ४०६८ ता. दि. ..........
वि. ...आ. वी... ..................

रघुवीर सामंत

यांची

# उपकारी माणसें

—[ एक सामाजिक प्रदीर्घ ]—

कादंबरी-माला

[ पृष्ठें सुमारें १२०० ]

प्रवासांतील सोबती

अ भ्र - प ट ल

आ का श गं गा

घरोघरच्या दे वी

## —अवश्य परिचित करून घ्या—

कापडी बांधणी अँ. पेपरची सवलतीची ग्रथालय प्रत

व्यवस्थापक-पारिजात प्रकाशन

१४ बी, हरजीवनदास एस्टेट, व्हिन्सेन्ट रोड, दादर, मुंबई १४